उदा. प्रवेश, सूचना देणारे ठिकाण, सूचनेचे प्रकार, कालावधी आणि विशिष्ट अभ्यासक्रमाचा (Course) अभ्यासक्रम.

## २.२ अभ्यासक्रमाची निर्धारके

अभ्यासक्रमाची निर्मिती ही शिक्षणाची ध्येय (उद्दीष्टे) हे बदलत्या समाजाच्या परिस्थितीनुसार बदलत असते. हे आपल्याला सर्वत्र पहावयास मिळते. हयाच कारणासाठी विविध पायाभूत अभ्यासक्रमाची व्याख्या करणे गरजेचे आहे. हे सामाजिक, तात्वीक व मानस शास्त्रासाठी फार महत्वाचे आहे.

१) सामाजिक - सामाजिक मूल्यांचे सहकार्य, सांधिक धैर्य व हिंमत, आणि सामाजिक कौशल्यांचा विकास (चेतवणे ) म्हणजेच 'सामाजिक" होय.

२) तात्वीक - हे शिक्षणाची तात्वीक मूलभूत तत्वांवर आधारावर, राष्ट्रीय उद्दीष्टे आणि शाळांच्या शिक्षणविषयक आधारावर आहे.

३) मानसशास्त्रीय - अध्ययनार्थी ची ( शिकणाऱ्याची) क्षमता, पात्रता आवड, अपेक्षा, वैयक्तिक ओळख फरक, शारीरीक व मानसिक विकास हे हयामध्ये खूप महत्वाचे आहे.

## २.३ अभ्यासक्रमाचा सामाजशास्त्रीय आधार

अभ्यासक्रम हा इष्ट (हवासा वाटणारा अभ्यासक्रम आहे असे गृहीत धरले आहे. हा अभ्यासक्रम सामाजिक ध्येये संपादन करण्यास मदत करतो. हया अभ्यासक्रमाने सामाजिक प्रगती होते. हयाच कारणासाठी सामाजिक शास्त्रज्ञ अत्यावश्यक अभ्यासक्रमाचे योग्य रितीने आयोजन करतात. अभ्यास क्रमास अनुसरुन पुढिल महत्वाचे मुद्दे लक्षात घेऊन नियोजन केले जाते.

१) अभ्यासक्रम असा असावा की ज्यायोगे शिक्षणाची सामाजिक ध्येये संपादन करण्यास मदत होईल.

२) अभ्यासक्रमाचे नियोजन आणि त्याचा सूचना पध्दतीशी संबंध असा असावा, ज्यामुळे समाजावर नियंत्रण करण्यासाठी परिणामकारक माध्यम तयार होईल.

आपण समाजाच्या विविध रचना आणि त्याचा अभ्यासाशी संबंध याना आपण समजून घेऊ या.

सामाजिक दृष्टीने शिक्षण ही संस्कृतीचे संवर्धन करणारी प्रक्रिया आहे. सामाजिक शास्त्रज्ञानाच्या दृष्टीने संस्कृतीचा अर्थ प्रसिध्द संदर्भपेक्षा खूप जास्त आहे. समाजाच्या संपूर्ण जीवनशैली संदर्भात असणारा मार्ग म्हणजे संस्कृती होय. समाजाचे ज्ञान, श्रध्दा, विश्वास, कौशल्ये आणि साचेबंद सामाजिक वर्तन आणि फक्त उत्कृष्ट असे नाही किंवा त्यांची महत्वाची जीवनशैली किंवा कला, संगीत वाङःमय होय. सामाजिक शास्त्रज्ञांच्या मते संस्कृती ही नैसर्गिक संज्ञा आहे. हयामध्ये प्रत्येक गोष्टीतून शिकायला मिळते. आणि संस्कृती मानवनिर्मित आहे. संस्कृतीचे जतन व संर्वधन करणारी शाळा ही एक विशेषतः स्थिर औपचारिक संस्था आहे. संस्था हया अभ्यासक्रमाद्वारे हया तत्वांना मुक्त करण्याचा शोध लावतात. हा शोध म्हणजे दुसरे काही नसून त्यांच्या मागदर्शनखालील एकंदरीत एकूण अनुभव होय.

**सामाजिक वर्ग आणि अभ्यासक्रम**

अभ्यासक्रम हा वर्ग मुक्त असावा. तसेच वादमुक्त ज्ञानाचा ठेवा असावा. हे मुलांसाठी चांगले आहे. अशा प्रकारचा वर्गमुक्त आणि वादमुक्त अभ्यासक्रम व ज्ञानाचा ठेवा शालेय मुलांसाठी मंजूर होऊ लागला आहे. अलिकडच्या काळातील समाजशास्त्रज्ञ समस्या विरहीत शिक्षणाच्या संधीची संकल्पना - ’काय शिकले पाहिजे“ किंवा शिक्षण घेत असलेल्या नापास विद्यार्थ्यांचा स्वभाव हया संकल्पनेवर संशोधन करु लागले आहेत. तथापी शालेय अभ्यासक्रम आदर्श सामाजिक न्यायाच्या स्पर्धेत आणि शिक्षणाच्या समान संधीच्या भूमिकेत कडक शिस्तीचे लक्ष्य होऊ लागला आहे. कमी मध्यम वर्गाचा विचाार केला असता त्यांच्यामध्ये बदल होत नाही. आर्थिक दृष्टया मागासलेल्या समाजातील मुलांमध्ये त्यांच्या आवडीनुसार त्यांना सुधरविण्यासाठी उपक्रम राबवले जातात. शालेय यश हे भाषा गणीतामधील चांगल्या मार्कावरच का मोजमाप करतात. सामाजिक सेवा व कार्य हयापेक्षा गणीतामधील गुणावरच यशाचे मोजमाप होते.

**अभ्यासक्रमाची समानता**

विविध प्रकारच्या अभ्यासक्रमामध्ये समानता आहे ही समानता उपसंस्कृती किंवा संस्कृतीचे निर्माण करते. अशा प्रकारच्या अभ्यासक्रम स्वीकारुन त्यास प्रतिसाद देणे कठीण आहे. हयाचे कारणपुढीलप्रमाणे.

अ) घरातील गरीब परिस्थिती

ब) इतर आर्थीक सामाजिक कारण

वरील त्रुटी भरुन आणि सांस्कृतिक मागासलेपणा भरुन काढण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे. म्हणून अभ्यास क्रम हा संस्कृतीपासून मुक्त, ज्ञान परावर्ती,भाषा, विज्ञान, गणित, कला, आणि इतरांनी विश्वास ठेवावा असा असावा. सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास साध्य करणारा अभ्यासक्रम असावा.

**सामाजिक शिक्षण आणि अभ्यासक्रम**

विशेषत अप्रिशक्षीत कामगार वर्गावर शालेय शिक्षण संपादनमध्ये सामाजिक घटकाचा प्रतीकूल परीणाम होतो. बासी बेर्नास्टीन चे प्रसिध्द असलेले सामाजिक शिक्षण हे उत्तम उदाहरण आहे. लहान मूल त्याच्या समाजरचनेत त्यांच्या भाषेतून शिकत असते हे त्याचे अनुमान आहे. लहान मूल त्याच्या बोली भाषेत परिणाम कारक शिक्षण घेते. बोलीभाषेतून शिक्षण आणि भविष्यात बोलीभाषेतून शिक्षणामध्ये इच्छीत परिणाम घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे. शाळा नेहमी औपचारिक भाषेचा उपयोग करते. हया भाषेमध्ये तत्वज्ञान, भावना, अर्थ असणे अत्यावश्यक नसते. त्या भाषेमध्ये पारंपारिक नाते संबंध चे वैयक्तिक निर्माण आहे.

अशा प्रकारे अनौपचारिक अभ्यासक्रमाची चौकट वैयक्तिक गरज आणि गतीमान समाजाच्या गरजा लक्षात ठेवून आखावी त्या पुढिल प्रमाणे आहेत.

वैयक्तिक आणि समाजाच्या गरजेनूसार अभ्यासक्रम लवचीक व बदल करता येण्यासारखा असावा.

- वैयक्तिक विकासाची वाढ करणारा निश्चित असा अभ्यासक्रम असावा.
- अभ्यासक्रम हा जबाबदार नागरीक बनण्याची प्रेरणा देणारा असावा.
- अभ्यासक्रम विविध स्वाध्यायांचा अंर्तभाव असणारा असावा.
- अभ्यासक्रम हा सिध्दांन्तापेक्षा प्रात्यक्षिकावर भर असणारा असावा.
- अभ्यासक्रम हा त्यांची जीवनशैली वैयक्तिक जगण्याची क्षमता असणारा असावा.
- अभ्यासक्रमाद्वारे सांस्कृतिक मूल्ये प्रकाशांत आणून त्याद्वारे उच्च संकल्पना समाजाच्या दुसर्या पीढीमध्ये रुपांतरीत करणारा असावा.
- अध्यापनाची पध्दत लोकशाहीवादी वाटणारी असावी. तसेच संकल्पना मूल्ये सुध्दा लोकशाहीवादी असावी.

**आपली प्रगती तपासा**

१) सामाजिक पायाभूत अभ्यासक्रमाची रचना स्पष्ट करा. त्याचा अभ्यासक्रम रचनेतील वापराचे वर्णन करा.

## २.४ अभ्यासक्रमाचा तात्वीक आधार

विद्यार्थ्यांनी संपादन केलेली शिक्षणाची उददीष्टे शिक्षकांकडून जोडलेल्या शैक्षणिक तत्वज्ञानावर अवलंबून असतात. अध्ययन करत असलेल्या विद्यार्थ्यांच्या तत्वज्ञानाची अभ्यासक्रमामध्ये भर पडते. अध्ययन अध्यापनासंबंधी शैक्षणिक तत्वज्ञानाबद्दलचे विचार परिवर्तन करण्यासाठी ठराविक समाजाकडून दबाव येतो. प्रत्येक तात्वीक शाळांचे

विद्यार्थ्यांच्या संपादनाच्या उद्दिष्टा विषयीचे विचार समान असतात. विविध शाळांचे अभ्यासक्रमाबददलचे तत्वज्ञान आपण समजून घेऊ.

**आदर्शवाद आणि अभ्यासक्रम**

कोणीही जगाचे वास्तविक व बाहय रुप जाणू शकत नाही असा आदर्शवाद्यांचा विश्वास आहे. वास्तवासंबंधी संकल्पनांचा शोध आणि प्रप्ती आपण करू शकतो. आकलनकर्ता त्याच्या जाणीवेचा उपयोग करुन त्यांच्या ज्ञानेंद्रियाद्वारे सुंदर संकल्पना प्राप्त करतो. आदर्शवादाच्या कल्पना हया वस्तूनिष्ठ विचारा पेक्षा अधिक महत्वाच्या आहे. चांगला शिक्षक आपल्या कल्पना विद्यार्थ्यांपर्यंत संप्रेषित करतो. विद्यार्थ्यांचा मानसिक आणि बौध्दीक विकास हा फार महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान संपादनाची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांने चांगले शिक्षण प्राप्त केले पाहिजे. विद्यार्थ्याने शिक्षणामध्ये उदार कला, जगण्यास आवशक्य असणारी कौशल्ये उदा. वाचन, लेखन, ऐकणे बोलणे आत्मसात केली पाहिजेत. सर्वसमावेश इतिहास, भूगोल, विज्ञान, कला, गणित, संगीत वाङःमय इ. चा अभ्यासाचा अभ्यासक्रमामध्ये समावेश असला पाहिजे. विद्यार्थ्यांना उदार कला अभ्यासक्रमाद्वारे जागतिक संकल्पना प्राप्त होते. इमॅन्यूल कान्तने (१७२४ ते १८०४ ) एकंदरीत मानवाच्या वागण्याबदल महत्व दिलेले होते. सुवर्ण नियम स्थिर असतात आणि सतत सुधारण्यासाठी किंवा बदलण्यासाठी नसतात. हयाचा उपयोग व्यक्तीच्या धर्म, संप्रदाय संबंधात करु शकतो.

**विद्यार्थ्यांना वैश्विक कल्पना सखोलपणे सतत सुचत असतात.**

वैश्विक सत्य सुचण्यासाठी मन नेहमी सर्जनशील आणि लवचिक असावे लागते. हे सर्व नैसर्गिक वातावरणामध्ये शक्य होईल.

आदर्शवादी शिक्षक पुढिल उद्दिष्टांवर जोर देत असतो.

- विद्यार्थ्यांना चिकित्सक आणि सर्जनशील विचार करण्यास मदत करणे. म्हणजेच मानसिक विकास
- जगण्यासाठी आवशक्य असणारा विषय (मजकूर) परिणामकारक वेळ आणि जागा हयामध्ये टिकून राहतो.
- शिकण्याच्या संपादनामध्ये उदार कलेवर जोर देणे.
- मानवी नीतीशास्त्रामध्ये वैश्विक घटकांचा अंतर्भावाचा परिणाम असणे.
- स्वतंत्रपणे विद्यार्थी मर्यादीत रुपात मानवाच्या वाढत्या अमर्याद गरजावर जोर देतात.

**वास्तववाद आणि अभ्यासक्रम**

बाहय जग हे दिसते ते खरे आहे असे वास्तववादी मानतात. त्या जगाच्या स्वरुपात अनुलक्षून मुलांना शिक्षण दिले पाहिजे असे वास्तवादी मानतात. शिक्षणात नेहमी काल्पनिक गोष्टी पेक्षा वास्तव (Reality) असली पाहिजे. वास्तवामध्ये प्रत्येक व्यक्तीस स्पर्श, वास,

चव यांचे ज्ञान असते. वास्तववादाची उद्दीष्टे प्रत्येक व्यक्तीस बाहय स्वरुपात जाणवतात. विज्ञान व गणित हे विषयाचे अभ्यासक्रम तात्वीक शिक्षणाच्या वास्तव वादामध्ये अत्यावश्यक आहेत. गणित व विज्ञान विषयामध्ये निःसंदिग्धपणा व अचूकता आत्यावश्यक असते आणि हे दोन विषय वास्तवाचे संख्यात्मक विवरण करतात. इतर क्षेत्रातील अभ्यासक्रमात अंतर्गत विषयांची मूल्ये चाचणी वेळी समोर येतात. वास्तवादी अभ्यास क्रम बदलल्या समाजाच्या प्रायोगिकतेनुसार बदलत नाही.

**वास्तववादी शिक्षक पुढिल उद्दिष्टावर जोर देतो.**

- विद्यार्थी गुणवत्तापूर्वक अभ्यासक्रमचा विशेषत अनुभव घेऊ शकतात.
- अध्ययन, अध्यापनपध्दतीमध्ये अचूकपणे मोजमाप केलेल्या उद्दीष्टावर भर देतात. अंतर्भाव केलेले घटक स्वीकाराहार्य व साक्षांकित असावा
- इतर अभ्यासक्रम क्षेत्रामध्ये वर्ग स्थिरतेवर जोर दिला जातो. अंतर्भाव केलेल्या अभ्यास क्रमातील घटकांसाठी अचूकता, वस्तुस्थिती, संकल्पना, उदात्तीकरण शास्त्रीय पध्दतीशी जोडलेले असावे. अध्ययन व अध्यापन पध्दतीमध्ये प्राप्त झालेल्या पर्यायावर भर दिलेला असतो. जास्त प्रमाणात उपक्रम कृत प्रकल्प सुचविले जातात.
- खरोखरच विद्यार्थ्यांना पर्यावरणातील प्रत्यक्ष घटक प्रत्यक्षिक अनुभवावरील प्रकल्पामध्ये मार्गदर्शन केले जाते.
- विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव जाणून घेण्याची गरज आहे.
- अध्ययन परीणामकारक व चिरस्थायी होण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाची गरज आहे.

**प्रायोगिक वाद आणि अभ्यासक्रम :**

प्रायोगिकवादी वास्तवातील अनुभवाच्या सादरीकरणावर विश्वास ठेवतात. प्रत्येकास आता आपणास काय अनुभवाचे आहे हे माहित पाहिजे. प्रायोगिकवादी आज हे सत्य आहे ते उद्या सत्य असेलच असे नाही याची चिकित्सा प्रायोगाद्वारे करतात. जसजशे समाजात बदल होतात तस तसे नवीन समस्या निर्माण होतात. हया समस्या जाणून घेण्याची व सोडविण्याची गरज आहे. जीवनातील प्रत्यक्ष परिस्थीतीच्या चाचणी (Test) साठी समस्या निराकरणाचे प्रयत्न प्रायोगिक स्वरुपात आहेत. समस्या निराकरणासाठी काय काम करायचे हयापेक्षा त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. सर्वसाधारणपणे वैयक्तिक गट समस्येची ओळखकरुन निवडतात आणि समाजातील त्या समस्या निराकरणाचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे वर्गामध्ये सामूहिक एकत्र काम करण्याच्या गरजेवर जोर दिला पाहिजे. शाळेचा अभ्यासक्रम असो किंवा जीवनाचा अभ्यासक्रम असो तो सदभावनेने वैयक्तिपणे पूर्ण करण्याची गरज आहे. गटाने किंवा वैयक्तिकपणे समस्या ओळखून त्या निराकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हयामध्ये अध्ययनाच्या चालू प्रक्रियेमध्ये आवड हेतू आणि त्यादृष्टीने प्रयास आवशक्य आहे. समस्या सोडविण्याऱ्यास समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नांची जोड

व आवड आवशक्य आहे. आवड व प्रयत्न एकमेकांपासून वेगळे करता येणार नाही. हे दोन्ही अभिन्न आहेत.

**प्रायोगिकवादी शिक्षक हे पुढिल उदिदष्टांवर जोर देत असतात.**

- समस्या निराकरणाची उदिदष्टे हे अभ्यासक्रमामधील पध्दतील अति महत्वाचे आहे.
- समस्या निराकरणासाठी विविध स्त्रोत्रांकडून तपशील गोळा करणे.
- गृहीत धरलेल्या गोष्टींचा विकासाचे उत्तर म्हणजे समस्येची ओळख होय.
- जर समर्थन दर्शवित असेल तर, गृहित धरलेल्या चाचणी पुर्नरचना करण्यासाठी.
- परिणामकारक कार्य करण्यासाठी समिती स्थापनेसाठी.
- शेवटी तयार केलेल्या उपक्रमास अनुरुप स्वीकारण्यासाठी.
- जीवनाच्या अभ्यासातील बदल हे सतत समर्थनीय असावे.

**अस्तीत्ववाद व अभ्यासक्रम**

अस्तीत्ववाद ही आधुनिक तत्वज्ञानातील प्रभावी विचारसरणी आहे. अस्तीत्ववाद हा अभ्यासक्रमामध्ये वैयक्तीक पणास मजबूत बनवण्यास जोर देतो. हयामध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तीस मुक्त वातावरणामध्ये निर्णय घेण्याची मुभा असते. अस्तीत्ववादयाच्या मते काय शिकायचे व कसे शिकायचे हयाचे निर्णय घेण्याचा अधिकार मुक्त वातावरणामध्ये घेता आला पाहिजे. जुन्या विद्यार्थ्यांपेक्षा सामान्यतः नवीन विद्यार्थ्यांना शिकण्यामध्ये अधिक मदत मिळते. अस्तीत्ववादी शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांना त्यांच्या भवितव्याचे निर्णय ठाममणे घेता यावेत. अशा प्रकारच्या शिकण्यासाठी वातावरण निर्मिती करतो. प्रत्येक विद्यार्थी हा मानव जातीत जन्मला असल्यामुळे त्याची निवड  त्याला करता आली पाहिजे. जर इतरांना आपला निर्णय वैयक्तिकपणे घेता येत असेल तर हया वैशिष्टयास मानवास का बरे बंधन असावे.

जर विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनाचे ध्येय व अध्ययन उपक्रम वर्गामध्ये लवचिक (वातावरणामध्ये ) चौकटीत राहून निवडता आले तर त्याची जबाबदारी त्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या  विद्यार्थ्यावर येऊन पडते. जे विश्वामध्ये आकलन होण्यासारखे आहे, त्याची वैयक्तिक निवड बनवणे खरोखरच खूप कठीण आहे. खरोखरच ही जबाबदारी फारच महान आहे. हया ठिकाणी अध्ययनामध्ये हयाचे नैतिक महत्व आहे. पदवी तयार करण्यासाठी प्रत्येक निर्णय हा एक नैतीक साधन आहे.

अस्तीत्वापुढे भविष्यकाळ उभा असतो. त्याच्यात आपल्या आवडीने माणसास स्वतःचे आस्तित्व द्यावे लागते. माणसे आपल्या अस्तित्वास अर्थ देऊ शकतात. सर्वाच्या स्वातंत्र्याचा आदर करणे हे नैतिक जीवनाचे एक सार आहे. प्रत्येक मनुष्य हया पृथ्वीवर जन्मतो आणि त्याचे आयुष्य जगतो. तो दुसऱ्यांचे अनुकरण करतो. नंतर तो अनुकरणातून

स्वतःची ध्येय धोरणे ठरवितो. त्याची ध्येय धोरणे इश्वरांकडून किंवा नशीबाकडून न येता त्याच्या स्वतःच्या उपक्रमातून (Activity) मधून उदयास येतात. एकविचाराचाने सुसंगत समाविष्ट होऊन तयार झालेला निर्णय अपेक्षित आकलनात्मक निकाल देतो. त्याच्या विरुध्द एकटेपणाने एकांगीपणा आणी दुःख प्राप्त होते. अस्तीत्ववाद्यांच्या दृष्टीने धर्म व शिक्षण हया दोघांचेही हित संबंध एक आहेत. आजचे शिक्षक त्रिबिंदू -

१) शिक्षक

२) विद्यार्थी

३) अभ्यासक्रम

**अस्तीत्ववादी शिक्षक पुढिल उद्दिष्टांवर भर देतो.**

- शिक्षणाच्या प्रक्रियेत शिक्षकांचा मोठा वाटा असतो. हे सर्वमान्य झाले आहे. विद्यार्थ्यास स्वतःच्या स्वत्वाची जाणीव करुन देण्यासाठी योग्य ती वातावरण निर्मिती शिक्षकांनी करावयास हवी.

- वर्गामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांच्या नियोजनाची गरज असते. संगणकास पुरविलेली माहिती विद्यार्थ्यांच्या कौशल्यासाठी नसून त्यांच्या पुरावा दर्शविण्यासाठी असते. हयामध्ये समाविष्ट विद्यार्थी त्यांचे स्वतःचे भविष्य व मुल्य पध्दती मुक्तपणे निवडू शकतात. शिक्षकांनी निश्चित केलेला अभ्यास अस्तीत्ववाद्यांच्या विचारांशी मेळ घालू शकत नाही.

- विद्यार्थ्यांना माणसांच्या द्विधा अवस्थेचे वर्गीकरण व अभ्यास करण्याची गरज असते. विद्यार्थ्यांना समस्या निराकरणाचे बाहय स्त्रोत शोधण्याची गरज असते. हे बाहय स्त्रोत समंजस, असंमजस किंवा हया दोघांच्या मध्ये असतात.

- विद्यार्थी शिक्षकाबरोबर जीवनातील असंमजस व हास्यास्पद परिस्थितीमध्ये मार्गदर्शनाची गरज आहे. हया असंमजस परिस्थितीच्या चौकटीत (Framework) परिणामकारक महत्वाचा निर्णय कसा घेता येईल? अस्तीत्ववादी शिक्षकाच्या मते परिणाम उदिदष्ट म्हणजे. विद्यार्थ्यांनी समजातील आचार विचारामधील असमतोल स्वीकारावयाचा आणि तो त्या वातावरणामध्ये परिणामकारकपणे दूर करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

- ज्या विद्यार्थ्यांच्यावर अस्तित्व वादांच्या विचारांचा परिणाम झालेला आहे. अशा विद्यार्थ्यांपर्यत वैयक्तिक आवडीची निवड करण्याचे आणि ते विद्यार्थ्यापर्यत संप्रेषित करण्याचे कार्य करण्याचा प्रयत्नावर शिक्षकांनी भर दिला पाहिजे.

हया कठीण वातावरणामध्ये अभ्यासक्रम हा मुलांसाठी केंद्रीत (Child Centered) असावा. अनौपचारीक शिक्षणामध्ये पुढील (बाबी) विचार मनात ठेवणे गरजेचे आहे.

अ) अशा विषयांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश असावा की जे विषय वास्तवामध्ये जीवनात उपयोगी पडतील आणि त्यामुळे जीवन सुकर होईल.

ब) शिक्षणाचा मूळ पाया संस्कृती व नागरीकरण हा आहे. हया दोन्ही विषयीचे ज्ञान असणाऱ्या विषयांचा अंर्तभाव अभ्यासक्रमामध्ये असावा. हे विद्यार्थ्यांना गौरव प्रितष्ठा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

अशा प्रकारे सर्वसमावेशक आकलनात्मक अभ्यास क्रम,भाषा, सामाजिक शास्त्रे, गणित, जीवशास्त्र, विज्ञान वाङःमय हया विषयामध्ये व्यवसायिकतेपणास चालना देणारा असावा. अभ्यासक्रमाचे आयोजन कार्यात्मक आणि वापरात्मक असावे.

**आपली प्रगती तपासा**

१) तात्वीक पायाभूत अभ्यासक्रम रचनेबाबत स्पष्टीकरण करा? अभ्यास रचनेतील वापराबाबत (Application) वर्णन करा?

## २.५ अभ्यासक्रमाचा मानसशास्त्रीय आधार

मानसशास्त्रीय पायाभूत शिक्षण विद्यार्थी केंद्रीत शिक्षण प्रक्रियेवर भर देते. शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी आहे. विद्यार्थी शिक्षणासाठी नाही.

मुख्यतः मानसशास्त्र विद्यार्थ्याच्या विविध अवस्थामधून विकास साध्य करत असते. न औपचारीक शिक्षक पध्दती मध्ये अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचा वयाचा विचार करुन त्याचप्रमाणे अभ्यासक्रमाची चौकट आखली जाते. विद्यार्थ्याच्या वैयक्तिक आवडी, क्षमता, गरज, सामर्थ्य हयामध्ये वैयक्तिक फरक असतो.

**अभ्यासक्रम रचनेवर परिणाम करणाऱ्या अत्यावश्यक घटकांचा आपण विचार करु या.**

**(विद्यार्थी)शिकणारा आणि अभ्यासक्रम हयामधील वैयक्तिक फरक**

ज्यावेळी आपण अभ्यासक्रम विभागाच्या वय आणि जास्त कालावधी अनुभवतो, त्यावेळी तदनुरुप अभ्यासक्रमाचे नियोजन मदतीस येते. वैयक्तिक फरकाच्या दृष्टीने सर्वामध्ये वैयक्तिकची व्याख्या करणे तसे अपुरे आहे. मुलांच्या विकास हा सर्वसाधारणपणे प्रमाणात आढळून येतो. विकासाचे प्रसंग मुला मुलामध्ये समान असतात. मूल चालायला लागायच्या अगोदर ते बुध्दी धारण करते. परंतु प्रत्येक मुलांमध्ये बुध्दी ग्रहण करण्याचे प्रमाण सारखे नसते. जुळया भावंडाचे सुध्दा बुध्यांक समान नसतात, मुलांच्या वाढत्या वयाबरोबर वेळ आणि गती या प्रसंगामध्ये फरक असतो. म्हणून वैयक्तिक फरकास सामोरे जाण्यासाठी अभ्यासक्रम हा लवचिक असावा. त्याला/ तिला त्यांच्या/ तिचा नैर्सगिक मार्ग व प्रगती मध्ये विकास करण्याची परवानगी असावी. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमामध्ये विविध सर्जनशील उपक्रम असावेत.

उदा- सादरीकरण, परिसंवाद, शोध , प्रकल्प आणि उपयोगी विकासचा अनुभव इ.

**बुध्दी (हुशारी) आणि अभ्यासक्रम**

बुध्दी किंवा मानसिक विकास हे शाळेच्या बाबतीत खूपच चिकित्सक आहे. शालेय अभ्यासक्रमाची महत्वाची उदिदष्टे, घटना व ज्ञान विकास समजून घेणे चिकित्सक आहे. बुदधीमत्तेचे स्वरुप आणि बुध्दीमत्तेवर परिणाम करणाऱ्या घटकांचे विकासात्मक क्षेत्र मानसशास्त्रांच्या दृष्टीने संशोधनासाठी आवडीचे क्षेत्र आहे. मुलांच्या मध्ये सामर्थ्य येण्यासाठी शाळेतील अनुभवाचा फायदा घेऊन आंतरीक बौध्दीक क्षमतांच्या फरकांचा अभ्यास केला जातो. हयाचा उत्कृष्ट वापर काही आधुनिक अभ्यासक्रम प्रकल्पामध्ये पहावयास मिळतो. मुलांच्या मध्ये विविध शिस्तीच्या संकल्पनांचे निर्माण करणे आणि हळूहळू त्यांना समजून घेणे नंतर त्यांची प्रगती मध्ये वापर करणे . ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात काळाच्या ओघात सापेक्ष प्रमाण वाढ झाल्याचे आढळून आले. आणि बुध्दीमत्ता चाचणीचा वाढत्या वयाबरोबर मानसिक वयामध्ये संशोधन आणि संशोधनाच्या निकालाचा वापर केला जातो. अशा प्रकारे मानसिक वयाचे निर्माण म्हणजे मुलाचे (१०) दहा वर्षापर्यतचे वय म्हणजेच कालक्रमानुसार १० वर्षे वय होय. बुध्दमता (I.Q.) म्हणजे मानसिक वय (M.A.) आणि कायक्रमानुसार वय (C.A.) यांचे प्रमाण आहे. अभ्यासक्रम हा सामान्य सरासरी (average) बुध्दीमत्ते नुसार असावा.

**अध्ययन प्रक्रिया आणि अभ्यासक्रम**

मनुष्य प्रणी कशा प्रकारे शिकतो ही समस्या मानसशास्त्रज्ञासाठी संशोधनास आवडीचा विषय आहे. अलिकडच्या काळामध्ये मानसशास्त्र विविध उत्तरे आणत आहे. पहिल्या ५० शतकामध्ये संकल्पना मोठया प्रमाणावर सर्वत्र प्रायोगिकरित्या पसरलेली होती अशा प्रकारचे प्रायोगिक तेने न तपासलेले अनुमान काढले गेले. एखादया क्षेत्रातील अनियंत्रित समस्या नेहमी चुकीच्या मार्गाकडे जाऊ शकते. उदा. त्या क्षेत्रातील लोकसंख्या सादरीकरणाचा नमुना. चुकीच्या कल्पना पुसून टाकण्यासाठी अभ्यासक्रमाशी संबंधित विविध मार्गाने संशोधन केले जात आहे. आणि अशा प्रकारचे शोध लागण्यास प्रारंभ होऊ लागला आहे. अशा प्रकारचे स्पष्टीकरणात्मक शोध अचूक व खात्रीशीर ज्ञान देतात. विस्तारीत प्रायोगाचा उपयोग नेहमी मर्यादीतच असतो.

विविध अध्ययन सिध्दांन्त विविध अभ्यासक्रम उपयोगीतेवर परिणाम करतात. मानसिक शिस्त सिध्दांतापासून निर्माण होणारा अभ्यासक्रमाची प्रवृत्ती संकुचित उददीष्टे आणि व्याप्तीमध्ये एकसंधपणा सतत अध्ययनातील अनुभव हया मध्ये दुर्लक्षीत केला जातो. वर्तणूकवादयांच्या सिध्दांतानुसार पुनरावृत्ती (repetition), मजबूतीकरण आणि परिस्थिती अभ्यासक्रमाणे निकाल (result) आणू शकतात. तयार केलेले अध्ययन साहित्य निर्माणाचे कार्यक्रम, अध्ययन यंत्राद्वारे शिकवले जातात. क्षेत्र सिध्दांत, अभ्यासक्रम आयोजनातील घटक, त्यातील तणाव, आयोजनातील समज व संबंध आणि अभ्यासक्रम आराखडा (design) हे घटक अनेक उद्दीष्टांच्या व्यापक अध्ययन सादीकरणमध्ये सेवा देतात. हया सिध्दांताचा परिणाम आधुनिक अभ्यासक्रम प्रकल्पामध्ये विविध विषयांच्या तणाव संबंधाच्या ज्ञान प्रप्ती मध्ये होतो. शालेय अभ्यासक्रम हा अंतीमदर्शी दृष्टीकोनातून अध्ययन अभ्यासक्रम हा स्पर्धात्मक असावा.

**आपली प्रगती तपासा**

१) मानसशास्त्रीय पायाभूत अभ्यास क्रम रचना बददल खुलासा करा.

२) तीन (Basic) मूलभूत अभ्यासक्रम रचना स्पष्ट करा. त्यांच्या अभ्यासक्रमातील रचना मधील वापरा बददल चर्चा करा?

## २.६ सारांश

स्वतंत्र भारतामध्ये वाढत्या गरजा, आकांक्षा, समानतावादी समाजाची आधुनिकरणाची मागणी, अभ्यासक्रमामध्ये सुधारणा दुरुस्ती, नूतनीकरण हयासाठी बरेचसे प्रयत्न झालेले आहेत.

थोडक्यात संक्षीप्तपणे अभ्यासक्रम हा समाजाच्या गरजा आवश्यकता, आकांक्षा आणि परिस्थिती अनुरुप असावा. हयामुळे गुणवत्ता प्रेमळपणे नागरीकांच्या मनावर बिंबवता येते.

अभ्यासक्रमामध्ये विविध उपक्रमांचा अंर्तभाव असावा.

**उदाः-**

१) विविध स्थळांना भेटी देणे

२) सामाजिक संपर्क

३) आढावा

४) चर्चासत्र

५) सर्वेक्षण

## २.७ स्वाध्याय

१) पायाभूत अभ्यासक्रम रचना म्हणजे काय? तात्वीक पायाभूत अभ्यासक्रम रचना स्पष्ट करा?

२) टिपा लिहा.

 १) वास्तववाद आणि अभ्यासक्रम

 २) वैयक्तिक फरक आणि अभ्यासक्रम

 ३) अभ्यासाची निर्धारके

❖❖❖❖

# ३

# मुक्त आणि दूरस्थ अध्ययनाशी संबंधित मुद्दे

**घटक रचना :**

३.० उदिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ सूचनात्मक मुद्दे (प्रवाह) (Issues)

३.२.१ तात्वीक स्तर

३.२.२ कार्यात्मक स्तर

३.३ शिस्तविषयक मुद्दे (प्रवाह)

३.३.१ विज्ञान

३.३.२ सामाजिक शास्त्रे आणि मानवतावाद

३.४ वैयक्तिक मूलभूत अभ्यासक्रम

३.५ प्रसंगोचित (Relevance) प्रवाह

३.६ प्रौढांच्या अध्यापनशास्त्र स्तरावर अभ्यासक्रम आणि विचारसरणी

३.६.१अभ्यासक्रम आणि विचारसरणी (Ideology)

३.६.२ प्रौढांचे अध्यापनशास्त्र (Andragogy)

३.७ जागतिक वातावरणामधील अभ्यासक्रम

३.८ सारांश

३.९ स्वाध्याय

## ३.० उदिष्टे

हा घटक वाचल्यावर आपण पुढील बाबी करु शकाल

- दूरस्थ शिक्षणाशी संबंधित वेगवेगळ्या अभ्यासक्रमाचे प्रवाहाचे (Issues) चे स्पष्टीकरण.
- विचारसरणी मधील अभ्यासक्रम नमुना आकाराचे वर्णन विशद कराल
- अभ्यासक्रम विचारसरणी (andragogy) प्रौढांच्या अध्यापनशास्त्र हयांच्या नातेसंबंधाची रुपरेषा.
- जागतिक वातावरणासाठी अभ्यासक्रमची आव्हाने ओळखाल.

## ३.१ प्रस्तावना

घटक -३ मध्ये आपण आता अभ्यासक्रमावर आधारीत, अभ्यासक्रमाचा पाया, त्याचा आकार आणि दूरस्थ शिक्षणातील अभ्यासक्रम अध्ययन प्रक्रिया समजून घेणार आहोत. ही प्रक्रिया समाज – राजकारण, अध्यापनशास्त्र आणि तत्वज्ञानाचा संस्कृती संबंधाच्या विचारसरणीची उपयोगी आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. मुक्त दुरस्थ शिक्षण अभ्यासक्रमातील आव्हांनाना वेळोवेळी नवीन आव्हाने, इतर सर्वसाधारण मुक्त दूरस्थ शिक्षण कार्यक्रमासारखीच असतात.

हया घटकामध्ये आपण, सूचनात्मक शिस्त प्रिय आधारावर, वैयक्तिक आधारावर, समर्पक मूलभूत प्रवाहावर संपूर्ण अभ्यास करणार आहोत.

## ३.२ सूचनात्मक प्रवाह (Issues)

अध्ययन आणि अभ्यासक्रम अत्यावशक्यपणे आराखडा प्रमाणे अध्ययनासाठी तयार केला जातो त्यास सूचना असे म्हणतात. शैक्षणिक प्रक्रियेमध्ये ज्ञानावर कौशल्यावर प्रकाश टाकला आहे. हयाचा आपण अभ्यासक्रम व्याख्या करण्यासाठी मर्मज्ञ (Judge) म्हणून महत्वाचा वापर करु शकतो. मुक्त दूरस्थ शिक्षणाचे अभ्यासक्रमाशी संबंधित विविध स्तर दृष्टीकोनातून सामोरे येतात. थोडक्यात तात्वीक आणि कार्यात्मक प्रकारामध्ये वर्गवारी होते. तात्वीक स्तरामध्ये अध्ययनामागील सिध्दांतामधील तत्वे आणि त्यांची अभ्यासक्रमाची संकल्पना अभ्यासक्रम नियोजकर्त्यावर परिणाम करतात. या ठिकाणी शिक्षणाच्या प्रक्रियेच्या अनेक टप्प्यावर सूचनात्मक प्रवाहाचे यजमानपद कार्यवाद किंवा प्रत्यक्षिक स्तर भूषवित असतो. आपणास विशिष्ट अभ्यासक्रमासाठी, अभ्यासक्रम नियोजन विशिष्ट अभ्यासक्रम, उत्पादन, माध्यम निवड, विद्यार्थी आधार सेवा, मूल्यमापन, अभिप्रय आणि इतरांची दखल घेणे गरजेचे आहे. पुढिल घटकामध्ये आपण अध्ययन सिध्दांतवर चर्चा करणार आहोत.

### ३.२.१ तात्वीक स्तर (Philosophical Level)

संपूर्ण अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या जोडीने अध्ययन आणि शिक्षक यांचा जागतिक दृष्टीकोन समजून घेणे गरजेचे आहे. अभ्यासक्रम नियोजन कर्त्याचा समजून घेण्याचा स्वभाव अभ्यासक्रम निर्णय प्रक्रियेवर परिणाम करु शकतो.

आपण अध्ययन सिध्दांन्ताची विस्ताराने चर्चा घटक ५ मध्ये करणार आहोत. आपण हया ठिकाणी थोडक्यात सूचनात्मक प्रवाहाचा अभ्याक्रम संबंधाचा नियोजन कर्त्याच्या तत्वज्ञानावर कसा प्रभाव पडतो हे समजून घेणार आहोत.

#### वर्तनवाद

हया संबंधीचे प्रयोग प्राणी, पक्षी, मुले हयांच्या आधारावर चालविले जातात. हा सिध्दांत अभ्यासक्रम नियोजन कर्त्याच्या चेतक – प्रतिसादावर प्रकाश टाकतो. जे नियाजकर्ते मानवी मनास दुर्लक्षित करतात. त्यांच्यासाठी हा सिध्दांत उपकारक आहे. हया सिध्दांता मध्ये शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्यावर अर्थातच नियंत्रण असते आणि अध्ययनकर्त्याची

निष्क्रीयता गृहीत धरली पाहिजे, सूचनात्मक आराखड्याचे महत्व समजून घेतले आहे. हया सिध्दांत मूलभूत सूचना गृहीत धरून अध्ययनकर्त्याची जैवीक वर्तणूक शिक्षक व्यवस्थित कुशलतेने हाताळू शकतो.

**बोधात्मक मानसशास्त्र**

वर्तनवादाप्रमाणेच बोधात्मक मानसशास्त्र शिक्षण प्रक्रियेत मानवी मनास मध्यवर्ती ठेवते. हया सिध्दांता अंतर्गत प्रमुख्याने मूलभूतपणे जर्मन मानसशास्त्रज्ञ मानवी मनास सर्वश्रेष्ठ स्थान देतो. वर्तनवादीचा दृष्टीकोन चे संबंध चेतक आणि प्रतिसाद, बोधात्मकवादी अध्ययनार्थी पूर्व ज्ञान आणि त्याच्या आतील ज्ञानाशी संबंधित असतो. हा सिध्दांत (Theory) नवीन अध्ययनाचे बोधात्मक रचनेशी असंबंधित असतो. आणि समस्या निराकरणासाठी हे एक आकलनात्मक साधन आहे.

**सर्वसंग्रहात्मकवाद (Eclecticism) युक्ती वाद**

वर्तणूक आणि बोधात्मकवादयाच्या संयोगाचा जागतीक दृष्टीकोन, रॉबर्ट एम. गॅगरी शैक्षणिक मानसशास्त्र पुढिल प्रमाणे वर्णन करतो.

शैक्षणिक प्रक्रिया ही व्यक्तीच्या वैयक्तिक बुध्दी अंतर्गत आणि बाहय वातावरणावर अवलंबून असते. त्याने बोधात्मक प्रक्रियेच्या नऊ पध्दतीची ओळख करुन दिलेली आहे. हयाची चर्चा आपण ५.५.१ हया घटकामध्ये करणार आहोत.

थोडक्यात अध्ययन सिध्दांत मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या अभ्यासक्रम विकासामध्ये कसा उपयोगी आहे. हे आपण समजून घेऊ या.

अ) अभ्यासक्रम नियोजकर्ता (Planner) वर्तनवादाकडे झुकतो व अध्ययनकर्त्याच्या भूमीकेकडे दुर्लक्ष करतो.

आ) अभ्यासक्रम नियोजन कर्ते संग्रही किंवा बोधात्मक साधनाचा व अध्ययनार्थीच्या पदवी

संपादन वर मुक्त प्रकाश टाकण्याची निवड करणारा असावा.

तसेच त्यांना त्यांचे शिक्षण त्यांना हवे ते आणि त्यांना जमेल अशा मार्गाने निवड करण्याची संधी देणारा असावा.

## ३.२.२ कार्यात्मक स्तर

कार्यान्वीत करणे, प्रत्यक्षिक किंवा कार्यवाद स्तरावर आपण मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या चौकटीतील विद्यार्थ्याना त्यांच्या अध्यापन आणि सेवा आधार देण्याबाबात निर्णय घेता येतो. विद्यार्थ्यांना जास्त (कठीण) अवघड चा बाबींचा सामना न करता सहज शिक्षण घेता येईल अशा प्रकारचे निर्णय घेतले पाहिजेत.

अध्ययन निग्रहीत जवळ जवळ विशिष्ट अभ्यासक्रम पुस्तके, अभ्यास आराखडा, माध्यमाची निवड, हयावर प्रकाश टाकून तसे अनुसंधान करुन तसा निर्णय घेतला पाहिजे. अंतर्गत भार, सादरीकरणाचा प्रकार, पुस्तकाचे स्वरुप, दृक –श्राव्य साहित्य आणि इतर अनेक

बाबी शिक्षणाच्या अनुसंधान वर (Strategies) परिणाम करतात. माध्यम निवडण्याचा निर्णय हा एक माध्यम (Media) घेणार किंवा बहुमाध्यम साधन (Multi-media) संपूर्ण विशिष्ट अभ्यास पूर्ण करुन घेणार हे गृहीत धरुन निर्णय घेतला जातो. तसेच मानवी स्त्रोत, तंत्रज्ञान, आर्थिक हयापैकी उपलब्धी असणारा असावा. माध्यमाचा कायदेशीरपणा आणि शैक्षणिक परिणामकारकता, माध्यमाविषयी निर्णय घेताना गृहीत धरावा.

मुक्त दूरस्थ शिक्षणाद्वारे नवीन विशिष्ट अभ्यासक्रमाचा विकास आणि सुरवात करण्यापूर्वी काही प्रश्न विचारले पाहिजेत ते पुढीलप्रमाणे -

अ) जर तुम्ही अनेक माध्यमांची निवड करत असाल तर माध्यमाचे प्रमाण काय आहे.

आ) स्वाध्याय शिक्षक कशा प्रकारे अधोरेखीत असावा किंवा संगण अधोरेखीत किंवा दोन्ही ही आणि जर दोन्ही असेल तर त्यांचे प्रमाण काय?

इ) एकंदरीत स्वाध्याय आणि मूल्यमापन प्रक्रिये मध्ये स्वाध्यायचे महत्व काय असेल?

ई) सुसंवाद रचना आणि सभोवतालच्या स्वाध्याय प्रतीसादाशी सुसंवाद मूल्यमापन आणि विद्यार्थ्यांना परतावा कसा असू शकेल?

उ) खाजगी शिक्षक विद्यार्थ्यांना कशा प्रकारे मदत करु शकेल?

ऊ) खाजगी शिक्षक विद्यार्थी समोरा –समोर भेटीच्या पुनरावृत्तीच्या वेग कसा असेल?

ऋ) विशिष्ट अभ्यासक्रम, विद्यार्थी प्रतिसाद, अभिप्रयाची परिणामकारकता हया सर्वांसाठी अभिप्रय यंत्रणा कोणत्या आहेत?

ऌ) अभ्यास केंद्राने पुरविलेल्या सुविधा विद्यार्थ्यांस जवळ जाण्यास सोप्या आहेत काय?
निश्चितच आपण अशा प्रश्नांचे वर्गीकरण पुढे चालू ठेऊ शकतो. परंतु आपण आता थांबू या. पुढे जाण्या अगोदर तात्वीक आणि कार्यवादाच्या प्रवाहाची आपण उजळणी करु या.

**आपली प्रगती तपासा**

१) अध्ययनासाठी वर्तनवादी आणि बोधात्मक वादी यामध्ये तुलना पाच ओळी मध्ये फरक लिहा.

## ३.३ शिस्तविषयक मुद्दे (प्रवाह)

अनुक्रमे शिस्त ही अभ्यासक्रम प्रवाह (ठाम) निश्चीत तयार करते. तात्वीक आणि कार्यवादाचे प्रवाह शिस्तीवर अवलंबून असतात.

उदा- रसायनशास्त्राचा अभ्यासक्रम तयार करत असताना तत्वे व त्यांचा वापर त्या विशिष्ट अभ्यास क्रमामध्ये बदलत असतो. त्याचप्रमाणे इतिहास विषयामध्ये सुध्दा तसेच आहे. आपण विविध शिस्त विषयक उदाहरणे आपण पाहू या.

### ३.३.१ विज्ञान

विज्ञानाचे विशिष्ट अभ्यास क्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी व त्या संस्थेस तसे अभ्यासक्रम चालू ठेवण्यासाठी मुक्त दूरस्थ शिक्षण तात्वीक व प्रत्यक्षिक गृहीत धरुन आणखी अशा प्रकारची मागणी शैक्षणिक संस्थाकडून केली जाते. विज्ञानाच्या प्रत्यक्षिक आणि यशासंबंधी संबंधित कार्यक्रम आणि त्यासाठी अत्यावश्यक मूलभूत पायाभूत सुविधा असणे गरजेचे आहे. विज्ञान विषयामध्ये सिध्दांत व प्रात्यक्षिकास तितकेच महत्व आहे. विज्ञान विषयामध्ये प्रयोगशाळा उपलब्धतेची सुविधा, शास्त्रीय उपकरणे, स्वाध्यायाचे स्वरुप, समोरासमोर संपर्काची वारंवारीता (Frequency) आणि इतर गृहीत धरले जातात. विद्यार्थ्यांना आकलन करण्यासाठी प्रत्यक्षिकामध्ये व्यस्त ठेवून अभ्यासक्रम स्तरावर उपलब्ध मूलभूत सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्या जातात. खाजगी शिक्षक विद्यार्थ्यांना आधार देतात. प्रशासक विज्ञानाशी संबंधित मुक्त दूरस्थ शिक्षणामध्ये पूर्व - नियोजित मागणीनुसार अंमलबजावणी करतात. विद्यार्थ्यांना एकत्र काम करुन गरजेनुसार प्रत्यक्षिक सादरीकरण करणे ज्ञानाचा विकास करणे तसे फारच अवघड आहे.

थोडक्यात वर्तनवाद्यांच्या तत्वानुसार विज्ञानातील अभ्यासक्रम हा सामाजिकशास्त्रे आणि मानवशास्त्रापेक्षा खूपच वेगळा आहे.

### ३.३.२ सामाजिक शास्त्रे आणि मानवतावाद

सामाजिक शास्त्रे आणि मानवतावाद अभ्यासक्रम यातील मागणी समजून घेऊन अध्यापनशास्त्र / प्रौढांचे अध्यापनशास्त्र ह्यांची शास्त्रीय विचारसरणी सुध्दा समजून घेतली पाहिजे.

त्याठिकाणी प्रत्यक्षिक असोत वा नसोत परंतु मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या चौकटीत निश्चित केलेल्या अध्ययन आधार व अध्यापनाशी अनुसंधान केले जाते.

**उदाः-**

१) वाङःमयाशी संबंधित प्रवाह

२) आर्थिक

३) राज्यशास्त्र

४) सर्वसामान्य लोकांना माहिती पुरविणारी साधने, (वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही. इ.) हयाद्वारे आपणास लवचिकता आणि सहनशील विचारसरणी, सहजपणे पदवी ची उदिदष्टे, हयांची देखभाल केली जाते. आपण विषयाशी संबंधित जागतिक दृष्टीकोन जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहीजे. मुक्त, खेळातून मोफत संकल्पना, आणि अर्थात्मक (स्पष्टीकरण) विद्यार्थ्यांना त्यांची माहित असलेली निवड करण्यास मदत करतात. ही निवड प्रवेशासंबंधी, संदर्भ, विचारसणी, अर्थात्म स्पष्टीकरण व इतरांशी संबंधित असते. जर आपण फरकासंबंधी जागरुक असेल तर, आपण हे फरक अभ्यासक्रम तयार करताना समाविष्ट करु शकतो.

प्रत्येक शिस्तीच्या प्रवाहाशी संबंधित यथार्थ (रचना) आराखडा (design) पासून उपयोगिता व परिणामकारकता जाणून घेता येते. मुक्त दूरस्थ शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार

करत असताना आपण शिस्तीकडे लक्ष दिले गेले नाही तर अभ्यासक्रम परिणामकारक होणार नाही तसेच तो संकुचित होईल.

पारंपारीक अभ्यासक्रम विषयामध्ये / शिस्तीकडे मुख्यतः लक्ष दिले जात असे. बदलत्या वातावरणामध्ये आपणास मुक्त दूरस्थ शिक्षणातील (ODL) वैयक्तिक प्रवाह जाणून घेणे गरजेचे आहे.

## ३.४ वैयक्तिक मूलभूत अभ्यासक्रम

शैक्षणिक विचार विद्यार्थ्यांना स्वतः प्रचलित काळामध्ये विचार करावयास प्रवृत्त करतात. मुक्त दूरस्थ शिक्षण (ODL) वैयक्तिक निवड व स्वातंत्र्याचा पाया आहे. मुक्त दूरस्थ शिक्षणातील अभ्यासक्रम स्वतःच विद्यार्थ्यांना लवचिकता स्वतंत्र अभ्यास आणि अभ्यासामध्ये त्यांना स्वायत्तता देते. मुक्त दूरस्थ शिक्षणातील व लवचिकतेस वास्तवामधील सत्य जाणून घेणे गरजेचे आहे.

अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वेळेचे बंधन लवचिक असावे. अभ्यासक्रम पूर्ण करत असताना सामाजिक, घरगुती, वैयक्तिक, व्यावसायिक जबाबदारीमध्ये व्यत्यय येता कामा नये. परंतु त्याच वेळी हे हि लक्षात ठेवले पाहिजे की संपूर्ण सत्रच लवचिक राहिले पाहिजे असे नाही.

मुक्त दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रमामध्ये व्यक्तीच्या भिन्न गरजा, विविध अध्ययन शैली, विद्यार्थ्यांच्या अभ्यास करण्याच्या सवयी, जाणून घेतल्या पाहिजेत. अभ्यासक्रम हा भौगोलिक, सामाजिक आणि अध्यापन शास्त्र / प्रौढांचे अध्यापन / शास्त्र हयामध्ये वैयक्तिक वाढ करण्यास वाव असणारा असावा. विद्यार्थी त्यांच्या सामाजिक परिस्थीनुसार वेगवेगळ्या भौगोलिक स्थानामध्ये विखुरलेला आहे. शहरी ग्रमीण, आदीवासी भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार व सामर्थ्यनुसार अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेता आला पाहिजे.

सर्वेक्षणातील नमुन्यावर आधारीत गरज, मुक्त दूरस्थ शिक्षणातील विशिष्ट क्षेत्रासाठी अभ्यासक्रम, वेगवेगळे (भिन्न) असू शकतात.

उदा. व्याख्याता लिखाणामध्ये संशोधन करु शकतो किंवा औषध विक्रेता डॉक्टर ( वैद्य) त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रामध्ये नवीन तंत्राचा शोध लावू शकतो. अशा प्रकारच्या वैयक्तिक गरजांची दखल घेऊन विशिष्ट अध्ययनाचा विषय / विशेष क्षेत्राच्या ज्ञान डोळ्यासमोर ठेवून मुक्त दूरस्थ शिक्षण कार्यक्रमाचे (आयोजन करते.) विद्यार्थ्यांना देते. एकदा जर आपण वैयक्तिक मूलभूत गरज आणि अभ्यासक्रमाची लवचिकता जाणून घेतली ( व्याख्या केली) तर पुढील बाबी गृहीत धरता येतील.

१) अध्ययन कर्त्याची उदिदष्टे.

२) अध्ययन पध्दतीस पंसती.

३) मूल्यमापनाची पध्दती.

४) अध्यापनशास्त्र.

५) किंमत.

काही लोकांना फक्त माहिती हवी असते, काही जणांना प्रमाणपत्र हवे असते, काही जणांना परीक्षेस बसण्याची इच्छा असते. हया सर्वाचा परिणाम अंतिम वैयक्तिक अभ्यास क्रमावर होतो.

## ३.५ प्रसंगोचित (Relevance) प्रवाह

समाजाच्या वैयक्तिक गरजा वेळेनुसार बदलतात. अभ्यासक्रम उपयोगी आणि फारच परीणामकारक होता. पुढे हा अभ्यासक्रम विविध कारणामुळे असंबध होता. अद्यावत आणि पूर्ण अभ्यासक्रम सुध्दा पुढे असंबदध होतो. तो आपल्या वैयक्तिक गरजा व आवड हयाच्याशी सुसंगत नसतो.

हया परिस्थितीमध्ये जेव्हा शाळा/ महाविद्यालये कालबाहय माहिती असलेले विषय शिकवतात. त्यावेळी अभ्यासक्रम ज्ञानाच्या नवीन पिढीसाठी संकुचित ठरतो. त्याचवेळी नवीन समाजास सामाजिक मान्यता मिळते. परंतु ह्या अभ्यासक्रमामुळे नोकरी प्रप्त होत नाही. सद्याच्या शैक्षणिक गरजेनुसार, अभ्यासक्रमाचा आढावा, पुर्नरचना करणे अत्यावश्यक आहे. हया स्पर्धेत दृष्टीपथात असणार्या समस्यांना मुक्त दुरस्थ शिक्षण तोंड देते. हया ठिकाणी दोन समस्या आहेत त्याची दखल घेणे महत्वाचे आहेत.

अ) पारंपारीक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थामधील अभ्यासक्रम रचना आणि अभ्यासक्रमांचे एकत्रीकरण लवचिक नसते. बहुतेक शैक्षणिक संस्था/ संचालक / विभाग पारंपारीक विद्यापीठांशी संबंधित असतात. आणि त्याच चौकटीत राहून तशाच प्रकारे संचालन करतात.

आ) लहानगटातील लोकांना संबोधित करण्यासाठी तयार केलेला अभ्यासक्रम प्रशासकीय दृष्टया व्यवहार्य होऊ शकत नाही. मुक्त दूरस्थ शिक्षणाची अभ्यासक्रम रचना जोपर्यंत जास्त कालावधी उपयोगामध्ये आणत नाही. तोपर्यंत तो अपयशी आहे. जीवनातील अभ्यासक्रम परिस्थिती (घटक) हयाची गरज अभ्यासक्रमाची सर्मपकता पाहून ठरविली जाते.

**आपली प्रगती तपासा**

१) वैयक्तिक मूलभूत अभ्यास क्रमावर परिणाम करणार्या प्रवाह (Issues) टिपा लिहा. आणि मूलभूत सर्मपक प्रवाहाशी कसे जोडले आहेत ते लिहा.

## ३.६ प्रौढांच्या अध्यापनशास्त्र स्तरावर अभ्यासक्रम आणि विचारसरणी

आपण आपल्या भावना अभ्यासक्रमातील संकल्पना सिध्दांत व अंतर्गत घटक इ. वर चर्चा व वादविवाद करुन व्यर्थपणे वेळ दवडत असतो. कोणताही शैक्षणिक उपक्रम हा अध्ययन अध्यापनामध्ये दुमार्गी प्रक्रिया आहे. मागणीनुसार शैक्षणिक कार्यक्रमातील घटकांचे पध्दतशीरपणे केलेले नियोजन म्हणजेच अभ्यासक्रम आहे. शिक्षणाच्या तात्वीक स्तरावर परिणाम करणारे अध्ययन सिध्दांत समजून घेतले पाहिजेत.

प्रौढांच्या अध्यापनस्तरावर विचारसरणी (Ideology) आणि अभ्यासक्रमची मुक्त दूरस्थ शिक्षणातील गरज हयांची हया ठिकाणी चर्चा करु या.

### ३.६.१ अभ्यासक्रम व विचारसरणी (Cirriculum & Ideology)

शैक्षणिक प्रक्रिया ही अभ्यासक्रमाचे खुलासवार टाचण जागतिक दृष्टीकोन डोळ्यासमोर, कोणासाठी, का व कशासाठी शैक्षणिक उपक्रम राबवायाचे हयाचा खुलासा करते. अलीकडेच आपण अभ्यासक्रमाची विशिष्ट अभ्यासक्रमाशी (Course) संबंधित आणि अभ्यासक्रम अध्यापन कार्यक्रम अंतर्गत घटकाची व्याख्या केलेली आहे. पुढे हळूहळू हे उपक्रम अध्ययन परिस्थिती अध्ययन अनुभवाची संपूर्ण मर्यादा वयामध्ये समाविष्ट केले जातात.

विकसित देशातील शिक्षणाची विचारसरणी जवळजवळ  उदारमतवादी किंवा वैयक्तिक आहे. परंतु त्यांची परीभाषा समाजावर परिणाम करणारी असते. संपूर्ण जगावर आधारीत युनेस्कोचा अहवाल पुढिलप्रमाणे आहे. 'ज्या ठिकाणी शैक्षणिक पध्दत अलिकडेच सुरु केली त्या ठिकाणी गंभीर असंबदध पणा दिसून आला आणि परदेशी नुमन्यांचे अनुकरण (Coppy) केल्याचे आढळून आले. मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या अभ्यासक्रम स्पर्धेत सिध्दांत, विकास, उपयोगीता, आणि मूल्यमापन हया चार विचारसरणीच्या प्रवाहाचा परिणाम मुख्यत्वे जाणवतो.

**खालील टेबल विचारसरणी दाखविते**

| टेबल -१ अभ्यासक्रम नमुने (Curricular Models) | |
|---|---|
| **पहिला दर्जाचा (Classical )** | **कल्पनाविश्वात वावरणारा (Romantic)** |
| विषय केंद्रीय | विद्यार्थी केंद्रीय |
| कौशल्य विकासावर भर | विद्यार्थ्यांच्या सर्जन शीलतेवर भर |
| अध्ययनापेक्षा सूचनावर ताण | अध्ययनासाठी शोधाची तरतूद (Provision) |
| माहितीचे संक्रमण | जागृतीवर भर, मूळ नवनिर्माण आणि स्वतंत्रता |
| शिस्तीवर भर, आजापालन आणि दृढता | सकारात्मक प्रयत्न आणि मूल्याने ध्येय विकास |
| ज्ञान प्राप्तीचे ध्येय | वास्तविक जीवनातील अनुभवावर भर |
| पूर्ण पध्दतीचा वापर आणि उपदेशात्मक सूचना | पध्दतीच्या वापरामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आणि सहकार्य |
| मूल्यमापनावर ताण | स्वयंअध्ययनावर ताण आणि स्वतःमध्ये सुधारणा (Classical) पहिल्या दर्जाच्या आणि कल्पना विश्वात वावरणार्या (Romantic) नमुन्यामध्ये फरक आहे. |

**पुढील भागात आपण प्रौढांच्या अध्यापन शास्त्रांचा विचार करणार आहोत.**

**(Andragogy) प्रौढांचे अध्यापनशास्त्र**

प्रौढांचे अध्यापनशास्त्र ही संकल्पना अध्यापनशास्त्रशी समांतर आहे. प्रौढांचे अध्यापन शास्त्र हे प्रौढांना शिकवण्याची कला व विज्ञान आहे. ही संज्ञा खूपच प्रसिध्द आहे व सोपी आहे. अध्यापनशास्त्राची पाच गृहीतके पुढीलप्रमाणे :

१) स्वसंकल्पना

२) अनुभव

३) अध्ययन उद्बोधन

४) शिकण्याची अनुकूलता, तयारी

५) प्रेरणा

प्रौढ स्वदिगदर्शित आणि प्रेरणा घेऊन शिकतात. त्यांचा अध्ययनाचा अनुभव समस्या केंद्रीय आणि विषय केंद्रीय असतो. प्रौढांचे अध्यापनशास्त्र हे सर्वसाधारण अध्ययन शास्त्राच्या विरुध्द आहे हे मुर्खपणाचे ठरेल कारण मुले सुध्दा स्वयंप्रेरणेने अभ्यास करत असतात. प्रौढांच्या अध्यापनशास्त्रा मध्ये मध्यवर्ती कल्पना वैयक्तिक स्वत्व आहे. संपूर्ण जीवनभर वैयक्तीक स्वत्व, स्वदिगदर्शन, आणि स्वतःची स्वतः अध्ययनामध्ये वाढ, सुधारणा करण्यासाठी स्वतःची स्वतःच मदत करणे गरजेचे आहे.

## ३.७ जागतिक वातावरणातील अभ्यासक्रम

मुक्त विद्यापीठ ऑस्ट्रेलिया (OUA) सात ऑस्ट्रेलियन विद्यापीठाशी सुसंगत आहे. डेडन (२००६) मुक्त ऑस्ट्रेलियन विद्यापीठ सहकार्याद्वारे अभ्यासक्रम निमिर्तीचा प्रयोग आहे. मुक्त विद्यापीठ ऑस्ट्रेलिया स्वतः नवीन अभ्यासक्रम दोन मार्गाने तयार करतात.

अ) मार्केटवर आधारीत स्वतः पुढाकार घेऊन केलेले सर्वेक्षण जागतिक वातावरण शैक्षणिक प्रक्रिया तयार करते. ही प्रक्रिया मुक्त दूरस्थ शिक्षणाचा जागतिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना संस्कृती व समाजाच्या जवळ घेऊन जातो. संस्था जागतिक लोकांच्या साठी अभ्यास क्रमांची निर्मिती करतात.

## ३.८ सारांश

हया घटकामध्ये खालील अभ्यासक्रमीय प्रवाहाबाबत (Issues) चर्चा केलेली आहे.

**सूचनात्मक प्रवाह:-**

सूचनात्मक प्रवाह पुढील प्रवाहाशी संबंधित आहेत.

१) तात्वीक स्तर आणि

२) कार्यात्मक स्तर

**शिस्तीवर आधारीत प्रवाह :** हे प्रवाह संबंधित आहेत.

- विज्ञान
- सामाजिक शास्त्रे
- मानवतावाद

**वैयक्तिक आधारीत प्रवाह :** विद्यार्थ्याच्या स्वयंशासीत (स्वतः) शी संबंधित असतात.

**संदर्भावर आधारीत प्रवाह :** हे विशिष्ट अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधी (Life) संबंधित असतात.

अभ्यासक्रम प्रवाह पुढिल दोन्ही संदर्भात असतात

अ) अध्यापनशास्त्र

आ) प्रौढांचे अध्यापनशास्त्र

## ३.९ स्वाध्याय

१) मुक्त दूरस्थ शिक्षणाशी संबंधित अभ्यासक्रमीय प्रवाह कोणते? समर्पक (प्रसंगोचित) अभ्यासक्रम प्रवाहाची चर्चा करा.

२) अभ्यासक्रम नमुने (Models) स्पष्टीकरण करा.

३) प्रौढांचे अध्यापन शास्त्र म्हणजे काय? प्रौढांच्या अध्यापन स्तरावर अभ्यासक्रम विचारसरणी बददल स्पष्टीकरण करा.

❖❖❖❖

# ४

# मुक्त आणि दूरस्थ अध्ययनातील अभ्यासक्रम पुरक प्रथा

**घटक रचना :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ मुक्त आणि दूरस्थ अध्ययनातील अभ्यासपुरक प्रथा

४.३ समुहासाठी शिक्षण

४.४ समुदायाचा विकास

४.५ ग्रामीण विकास

४.६ राष्ट्रीय विकास

४.७ सारांश

४.८ स्वाध्याय


## ४.० उद्दिष्टे

हया घटकाच्या वाचनानंतर आपण पुढील बाबी कराल.

- सर्वसाधारण लोकासाठी/ समाजासाठी/ जमातीसाठी, ग्रामीण भागासाठी/ राष्ट्रीय विकास हयामध्ये मुक्तदूरस्थ शिक्षणाची भूमीका.
- भारतात, भारताबाहेरील, जगातील मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या अभ्यासक्रम रुपरेषेचे महत्त्व व अभ्यास क्रमातील नवीन प्रथेचे महत्त्व.
- मुक्त आणि दूरस्थ शिक्षणाचा ग्रामीण व राष्ट्रीय विकासमध्ये आंतरसंबंध समजून घेणे.
- जागतिक वातावरणामध्ये अभ्यास क्रमातील नवी प्रथा दाखवून देणे.

## ४.१ प्रस्तावना

अभ्यासक्रमावर शिस्त, शिस्तीचा आराखडा, समर्पकता आणि विचारसरणी हयांचा परिणाम होतो. हया घटकामध्ये आपण मुक्त दूरस्थ शिक्षणातील नवीन प्रथांचा अभ्यास करणार आहोत.

अभ्यासक्रम हा विशिष्ट अभ्यास क्रम (Course) (अभ्यासाचा कार्यक्रम) तसेच वेळ (अध्ययनाचा अनुभवाचे नियोजन) हया अध्ययन व अध्यापनाच्या परस्पर क्रिया आहेत. अभ्यासक्रमाचा इतिहास जाणून घेतल्याशिवाय आपण अभ्यासक्रमातील नवीन प्रवाहांची

संपूर्ण अभ्यास करु शकणार नाहीत. परंतु हे शिक्षणाच्या इतिहासाशी आंतरसंबंधित आहे. अभ्यासक्रमाची केवळ शैक्षणिक तत्ववेत्याच्या दृष्टीने व्याख्या करता येत असे नाही परंतु सामाजिक गरजेनुसार देखील व्याख्या करता येते.

पारंपरीक अभ्यासक्रम हा धर्मावर-आधारीत उद्बोधनावर मर्यादीत होता. जागतिक महायुध्दापूर्वीच्या काळचा शैक्षणिक अभ्यासक्रम हा विषय केंद्री वस्तुस्थितीवर आधारित तपशीलावर भर देणारा होता. दुसऱ्या महायुध्दानंतर जग ३ भागात विभागले गेले.

१) साम्यवादी कम्युनिस्ट

२) पाश्चीमात्य, साम्यवाद न मानणारा

३) उर्वरीत जग

१९६० च्या मध्यास मानवतादी ध्येय, साध्य करण्यासाठी, जन्मजात शिक्षण, प्रयोगिक अध्ययन उपक्रम निर्मितीस चालना मिळाली मुक्त दूरस्थ शिक्षणाची सुरवात १७व्या शतकात पाश्चिमात्य देशात झाली. भारतामध्ये पोहचण्यास १९व्या शतकाच्या अखेरीस म्हणजेच १८९१ ते १९०० साल उजाडले. २० व्या शतकाच्या अखेरीस जगातील साम्यवाद संपुष्टात आला. २१व्या शतकाच्या अखेरीस सांप्रदायीक शिक्षण हे उदार शिक्षणामध्ये बदलले. अभ्यासक्रम हा माहिती पासून समजून घेण्यामध्ये आणि वापरामध्ये बदलला.

भारतामध्ये १९४७ मध्ये ब्रिटीश शैक्षणिक पध्दत आणि त्यांचा अभ्यासक्रमास भारतामध्ये सुरवात झाली. जानेवारी १९६१ मध्ये केंद्रीय सल्लागार शिक्षण मंडळ, यांनी उच्च योजना भारतामध्ये तयार केली. शिक्षणासाठी समिती स्थापन केली. त्या (समिती) कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डी.एस. कोठरी होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली भारतामध्ये पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणाची सुस्पष्ट योजना स्थापन झाली. दिल्ली विद्यापीठाने त्यासाठी अत्यावश्यक कायदे करुन पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणाची सुरवात १९६२ मध्ये सुरु झाली. १९६० ते १९७० च्या दरम्यान पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणामध्ये वाढ झाली. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण (NCERT) ने शिक्षणाविषयी अभ्यासक्रमाची रचना डिसेंबर २००५ मध्ये प्रकाशित करण्यात आली. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर १९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षणाच्या इतिहासामध्ये महत्वाचे पाऊल टाकले. त्याचा उद्देश राष्ट्रीय प्रगतीकडे, साधारण नागरीकांच्या प्रगतीकडे, वाटचाल, राष्ट्रीय एकात्मतेमध्ये सुधारणा हे आहे. १९७६ च्या घटनात्मक कायद्यातील तरतूदीनुसार समकालीन शैक्षणिक यादी जवळ पास तयार करण्याची एकत्रिक जबावदारी केद्र व राज्य सरकारची आहे. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भारतास २१ व्या शतकासाठी (पाश्वभूमीची) परिस्थितीची तयारी करुन ठेवली होती. हयाने जीवनभर शिकण्याच्या भूमीकेवर भर दिला. जीवनभर शिकण्याच्या आशेचा उद्दिष्टाने शैक्षणिक प्रक्रियेवर भर दिला.

२०व्या शतकाच्या सुरवातीस अलीकडेच अभ्यासक्रम हा नाटयमय बदलातून जात आहे. हयासाठी दिग्दर्शन पुढिल प्रमाणे :

- वाढीस विशेष महत्त्व आणि उपयोगात्मक प्रकारामध्ये बदल.
- हा एक वेगळा भाग आहे. आणि तो अधिक आंतर शिस्त प्रिय आहे.

- गरजेस अधिक महत्त्व दिले जाते.
- अध्ययनार्थी आणि विद्यार्थ्यांची मागणी
- सामाजिक गरजेनुसार गतीमान अभ्यास क्रमाचे स्वरुप.
- वाढत्या तंत्रज्ञानाचे महत्व.
- अंतर्गत घटकांतील सूचनांचे प्रसारण.
- व्यवसायिकरण नाही परंतु अधिक जीवनावश्यक
- प्रत्येकासाठी निरंतर व्यवसायिक शिक्षण.

## ४.२ मुक्त आणि दूरस्थ अध्ययनातील अभ्यासपुरक प्रथा

मुक्त आणि दूरस्थ शिक्षणातील अभ्यासक्रम हा विशेषत तिसऱ्या जगासाठी तयार केलेला असतो. आता तिसरे जग म्हणजे जे देश आर्थिक आपल्या देशाची प्रगती करु इच्छितात अशा देशांचा समूह त्यास विकसनशील देश असे म्हणतात. विविध गट, स्त्रिया विविध जमाती, तरुण किंवा आर्थिक स्थिती चांगली नसणारी असहाय मुले, विविध कारणाने दुरुस्त शिक्षणाकडे वळतात. औपचारिक शिक्षणापासून वंचित असलेल्या स्त्रियांसाठी मुक्त दूरस्थ शिक्षणाची गरज व आवशक्यता होती.

विविध कारणास्तव दूरस्थ शिक्षणाकडे वळलेले लोक पुढिलप्रमाणेः

१) सामाजिक व वैयक्तिक कारणाने शिक्षणापासून वंचीत राहिलेल्या स्त्रिया

२) मुख्य शैक्षणिक प्रवाहात समाधानी नसलेले व त्यांच्या गरजेप्रमाणे शिक्षण मिळत नसलेले ग्रामीण व आदीवासी भागातील लोक.

३) व्यावसायिक शिक्षणाची इच्छा असलेला तरुण वर्ग

४) नियमित शाळा महाविद्यालये मध्ये हजर राहू न शकणारे विद्यार्थी.

वरील सर्व प्रकारचे विद्यार्थी आपल्या ध्येयपूर्ती साठी दूरस्थ शिक्षणाकडे वळतात.

प्रौढ शिक्षण आणि कामगार शिक्षण आणि अनियमित अभ्यास क्रम.

उदा. १) विशेषत कोलंबा येथील फ्रेंच व लॅटीन आणि पॉलीन लोकांची विचारसरणी

२) ब्राझील व चिली मधील वरिलप्रमाणे समान प्रायोगिक प्रात्यक्षिकासाठी

३) स्वयंरोजगार अहमदाबाद येथील स्त्रियांचे संघटन – हे संघटन एकात्मिक मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या समोरा-समोरील परिस्थिती मध्ये होते. मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या नवीन प्रथांचे चार प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते.

**१) समुहासाठी शिक्षण :**

मुक्त दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम सर्वसामान्य लोकांच्या गरजांची दखल घेऊन सर्वसामान्य लोकांच्या वैयक्तिक ध्येय पूर्ती करण्यामध्ये सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी योगदान देतो.

अशा प्रकारे वैयक्तिक गरज ही पुढिल प्रमाणे असू शकते.

१) पदवी पूर्ण करणे.

२) ज्ञानप्रप्ती करणे.

३) नियमित पणे पदवी संपादन करता आली नाही म्हणून जाऊन सर्वसामान्य लोक दूरस्थ शिक्षणाकडे वळतात.

**२) समुदायाचा विकास :**

समुदायाच्या जीवन शैली मध्ये सुधारणा करण्यासाठी असणाऱ्या गरजांची हा अभ्यास दखल घेतो. हयामुळे जाती जमातीच्या विकासाचा विस्तार करुन त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये नवीन प्रथा सुरु करता येते. बहुतेक मुक्त दूरस्थ शैक्षणिक संस्था भारतामध्ये आज समुदाय विकासाचे अभ्यासक्रम विविध भिन्न विशिष्ट अभ्यासक्रमा (Course) द्वारा भिन्न आश्रय दाता वर्गासाठी नियोजन करत आहेत.

**३) ग्रामीण विकास :**

ग्रामीण जीवनातील ग्रामीण भागास केंद्रिय करुन, ग्रामीण गरजा समजून घेऊन ग्रामीण लोकांचे जीवनमान सुकर (अधिक चांगले) होईल अशा प्रकारचा अभ्यासक्रम असतो.

**४) राष्ट्रीय विकास :**

शैक्षणिक प्रक्रियेचे विस्तृत ध्येय म्हणजे, वैयक्तिक ज्ञानवृध्दी, व वाढ, सामर्थ्य, कौशल्ये व प्रात्यक्षिक हया मध्ये सुधारणा होय. जागतीक मुक्त दूरस्थ शिक्षण हे नेहमी गरीबातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन आणि शिक्षणा द्वारे मानवी स्त्रोताची उपलब्धी करुन राष्ट्रीय विकासा मध्ये विशेष लक्ष्य बनविते. देशाच्या विशिष्ट भागातील वाढत्या औद्योगिकरणाच आणि जागतिक गरजा यांचा अभ्यास क्रमामध्ये समाविष्ट करुन देशास विकासाच्या दृष्टीने घेऊन जाण्यास मदत होते.

## ४.३ समुहासाठी शिक्षण

भारतामध्ये फार वर्षापासून विविध राज्यातील मुक्त आणि दूरस्थ शिक्षण देणाऱ्या संस्थानी त्यांच्यामध्ये सर्वसाधारण लोकांसाठी लोक शिक्षणाच्या संधी निर्माण करुन पारदर्शकता आणली.

खालील विद्यापीठानी त्यांच्या प्रादेशिक (स्थानिक) त्यांच्या राज्यात विद्यार्थ्यांच्या मागणी प्रमाणे अभ्यासक्रम सुरु केले.

१) बी. आर. आंबेडकर विद्यापीठ हैद्राबाद १९८२.

२) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ स्थापना १९८५.

३) राज्य मुक्त विद्यापीठ नाव वर्धमान महावीर मुक्त विद्यापीठ १९८७

४) नालंदा मुक्त विद्यापीठ १९८७

५) एमपी भोज विद्यापीठ १९९१

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ गुजरात १९९४.

७) कर्नाटक मुक्त विद्यापीठ मैसूर -१९९६

८) नेताजी सुभाषचंद्र बोस मुक्त विद्यापीठ कलकत्ता १९९७

९) यूपी राजश्री टन्डन मुक्त विद्यापीठ अलाहाबाद, १९९८.

१०) तामीळनाडू मुक्त विद्यापीठ चेनाई २००२.

पंजाबी विद्यापीठ पतीयाळा ने एम. फील हा (कोर्स) विशिष्ट अभ्यासक्रम दूरस्थ प्रकारामध्ये इंग्रजी आणि पंजाबी भाषेत सुरु केला.

उदा.- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (य.च.म.मु.वि.) १९८९ मध्ये स्थापना झाली. हया विद्यापीठाने बी.ए.बीकॉम तसेच सायन्स तंत्रज्ञान, ॲप्लाप्ईड, इलेक्टानिक्स् असे २२६ शैक्षणिक कार्यक्रम सुरु केले. तसेच वार्षिक २,५०,००० विद्यार्थ्यांनी सरासरी नोंद केलेली आहे. तसेच १,७०,००० विद्यार्थ्यांनी (http://ycmou. digitaluniversity. ac) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने १७५ कार्यक्रम २१ शाळांमधून अभ्यासाची नोंद व दोन मिलीयन गुण (mark) नोंद आहे.

देशामध्ये असलेले भाषाशास्त्र, हवामान शास्त्र, भौगोलिकशास्त्र, सांस्कृतिक वातावरण, अशा भिन्न वातावरणामध्ये मुक्त दूरस्थ शिक्षण स्वतः टिकाऊ उपाय शोधून काढून बहुसंख्य अशिक्षित लोकांना सर्वसामान्य शिक्षणाकडे घेऊन जाते. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) हयांनी दूरस्थ शिक्षणाद्वारे मोठया प्रमाणामध्ये शिक्षण वेळ व जागा हया दोन घटकासाठी सोईस्कर आहे. मोठया प्रमाणात औपचारीक, न-औपचारीक शिक्षण पध्दतीमध्ये पोहचण्यास (कठीण) असहाय असणारे कार्य मुक्त दूरस्थ शिक्षण अधिक संबंधित, समर्पक आणि अर्थपूर्ण पणे तयार करते.

१९व्या शतकाच्या शेवटी प्रगत अंतर्गत संप्रेषणात्क तंत्रज्ञानाने विविध संगणक शिक्षण (course) विशिष्ट अभ्यासक्रम विशेष तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील व्यवस्थापकीय कार्यक्रम, परदेशी व्यापाराबाबत कार्यक्रम, पर्यावरण व्यवस्थापन, मानवी (अधिकार), हक्क, प्रदूषण व्यवस्थापन योग, फलज्योतीष असे विविध कार्यक्रम सुरु झाले. तांत्रिक आणि पॅरामेडीकल हे महत्वाचे कार्यक्रम मुक्त दूरस्थ शिक्षणाद्वारे १९व्या शतकाच्या शेवटी मिळाले. दूरस्थ शिक्षण परिषदेने २००४ सालच्या अहवालामध्ये ४२९ शैक्षणिक कार्यक्रम

व त्यासोबत ३४८३ (कोर्सेस) विशिष्ट अभ्यास भारतातील ११ मुक्त दूरस्थ शैक्षणिक संस्थाचा अंर्तभाव आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) गेल्या दोन दशकापासून अभ्यास क्रमास भेडसावणाऱ्या पाच बदलाची यादी लिहा.

## ४.४ समुदायाचा विकास

पुष्कळ जमाती जसे असहाय, तात्पुरते अपंगत्व, भौगोलिक दृष्टया मागासलेल्या भागातील लोक हया सर्वांसाठी मुक्त शिक्षण ही त्यांची निवड नसून मुक्त दूरस्थ शिक्षण हा त्यांच्यासाठी एक पर्याय आहे. त्याचवेळी तंत्रज्ञान ग्राहण करण्याचे अज्ञान, विद्युत स्त्रोताची अनुपलब्धी, किंवा डीजीटल (अंकात्मक) जोडणीचा अभाव, किंवा विशेष भाषा वाङःमयाचा अभाव हयाचा प्रभाव दूरस्थ शिक्षण विशेष ठिकाणी स्वीकारण्यामध्ये होतो.

युनाइडेट नेशन कॅपीटल डेवहलमेंट फंड (UNCDF) हयांनी दूरस्थ अध्ययन (कोर्स) विशिष्ट अभ्यासक्रम सप्टेवर २००२ मध्ये सूक्ष्म आर्थीक (MFDL) विकास केला. हया (कोर्सची) विशिष्ट अभ्यास क्रमाची रचना ही विद्यार्थ्यासाठी काम करणाऱ्या व्यावसायिकासाठी, सराव करणाऱ्यासाठी योजना बनवणाऱ्यांसाठी देणगी देणाऱ्यासाठी, सामाजिक जबाबदारीची गुंतवणूक करण्यासाठी आणि इतर कार्यात्मक विकास करणाऱ्यांसाठी होता. हया कोर्सच्या पॅकेजमध्ये २ सीडी. रोमस आणि काही निवडक वाचन साहित्य याचा अंतर्भाव होता. जरी हा कोर्स शिकवणी संबंधी रचीत असला तरीही http://www.uncd.org/mfdl हया वेवसाईडवर मुक्त पणे उपलब्ध असेल.

जेव्हा आपण माध्यमांचे मूल्यमापन करतो, त्यावेळी विद्यार्थ्यांनी माहिती शोधक असावे, माजी विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुणाई, प्रशासक आणि तंत्रज्ञ. तुमच्या मूल्यमापन साधनासाठी तुम्ही औपचारीक व अनौपचारीक मुलाखती किंवा प्रश्नाचा उपयोग करु शकता. प्रकर २ मध्ये एकंदरीत ग्रहणक्षमता (assessment) पध्दती विषयक सादरीकरणावर आहे. विशेषत केम्प व डायटन (१९८५ : ६७) सुचवितो की तुमच्या प्रश्नांची रचना अशी असावी त्यामुळे योग्य उत्तर मिळू शकेल.

**उदाहरणार्थ**

- माध्यमांवर आधारित उदिदष्टे विद्यार्थी चांगल्या पध्दतीने कशा प्रकारे पूर्ण करतील?
- प्रतिक्रीया ही वर्ग माध्यमांची किंवा वैयक्तिक विद्यार्थ्यांची खूण आहे काय?

- जर माध्यम उद्दिष्टांशी तडजोड करत नसेल तर उजळणी (revision) काय करु शकेल.
- तुम्हास किंवा विद्यार्थ्यांस माध्यम व्यवस्थेचा उपयोग (योग्य) सोईस्कर आहे का?
- हाईवेअरच्या वापरामध्ये कोणती (कठीणपणा) अवघडपणा (difficulty) आढळली होती का?
- माध्यमांच्या विकासाची किंमत काय होती?( व्यावसायिक आणि कर्मचारी वेळ, साहित्य सेवा )

वरील प्रश्नांच्या उत्तरांच्या आधारे तुम्ही सूचनात्मक माध्यमांची सुधारणा करु शकता.आणि / किंवा त्या मार्गाचा अवलंब करु शकता. परीणामकारकतेचा दर्जा राखण्यासाठी ठराविक वेळेत (periodically) मूल्यमापन (पुन्हा पुन्हा) वारंवार करावे. हा उपदेश / सल्ला आहे.

**मूल्यमापनाचे प्रकार :सातत्यपूर्ण व अंतिम**

(Software) सॉप्टवेअर विकासाची प्रिक्रया सुरु करण्यापूर्वी काही विशिष्ट निर्णय घेण्याची गरज आहे. हे निर्णय Software विकासाच्या प्रिक्रयेमध्ये मार्गदर्शन करतात. प्रत्यक्षात हे निर्णय मार्गदर्शक तत्वे आहेत. आणि (Software) विकासक हे प्रश्न विचारणारे असतात. विकासक नियोजन प्रक्रीये ची उद्दिष्टे ठरविण्यामध्ये सक्षम असतात. एकदा का (ज्rदूदूब्ज) मूळ नमुना सॉप्टवेअर तयार झाला की त्याचे चाचणी (test) घेतात. तसेच पुन्हा एकदा उदिदष्टांचे पूर्नपरीक्षण आणि अभिप्रय व मूल्यमापनाच्या आधारे त्यांना पुन्हा सूत्रात मांडले (reformulated) जाते.

## ६.५.३ मूल्यमापनाचे प्रकार

मूलतः मूल्यमापन हे दोन प्रकारचे असते.

१) सातत्यपूर्ण मूल्यमापन (Continous evaluation)

२) अंतिम मूल्यमापन (Terminal Evalution)

**हयाची चर्चा आपण खाली करणार आहोत.**

### १) सातत्यपूर्ण मूल्यमापन (Continuous Evaluation)

मुक्त दूरस्थ अध्ययनाच्या सतत विकासाच्या प्रक्रीयेमध्ये सातत्यपूर्ण मूल्यमापन कार्य करत आहे. तसेच विकासाची प्रिक्रया प्रत्यक्षात सुरु होण्यापूर्वी सुध्दा सातत्यपूर्ण मूल्यमापन सुरु होते. सॉप्टवेअर विकासाच्या प्रक्रीयेच्या सुखातीस घेतलेले निर्णय हे सॉप्टवेअरच्या विविध स्वरुपावर परीणाम करतात. कोणी, का, कशा प्रकारे, (How) कोठे, अशा प्रश्नांची उत्तरे सॉप्टवेअर विकासामध्ये मार्गदर्शक ठरतात. वेळ आणि स्त्रोत यांच्या नुसार सातत्यपूर्ण मूल्यमापनामध्ये गुणात्मक व संख्यात्मक दोन्ही पध्दतीच्या अभिप्रयाचा वापर केलेला आहे. कोणतीही सूचनात्मक पध्दत विद्यार्थ्यांना गरजा पूर्ण करु शकत नाही. प्रत्यक्षात एकच

प्रोग्रॅम सर्व शंकाची (queries) उत्तरे एकाच विभागामध्ये (पुरवू) देवू शकला तर तो प्रोग्रॅम यशस्वी गृहीत धरला जातो. प्रत्येक सॉप्टवेअर विकासक (Developer) सॉप्टवेअर सुपूर्द (Handover) करण्यापूर्वी म्हणजेच सॉप्टवेअरची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्याची अमर्याद व्याप्ती आवश्यक ठरवितात.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर आपण आळीपाळीने कार्यक्रमाचे (program) आक्षेप शोधले पाहिजेत.

खालील काही प्रश्नांची उत्तरे देणे गरजेचे आहे. कारण हयाचा परिणाम अंतर्गत घटकांवर आणि तंत्रज्ञान निवडीवर होईल.

१) हया सॉप्टवेअर चा लक्षवेधी वापर करणारे कोण आहेत? आणि हया लक्ष्याचा वापर करण्याऱ्याचा (user) स्तर काय आहे?

२) विद्यार्थ्यांना नेहमी प्रमाणे संगणकाकडून कोणता स्तर अपेक्षित आहे?

३) विषयासंबंधी उद्दिष्टे सूचनात्मक पध्दतीमध्ये काय व्याप्त (Cover) आहेत?

४) प्रोग्रॅमचा उपयोग कसा असेल?

अ) वर्गखोली अध्यापनास पूरक आहे का?

आ) संपूर्ण कोर्सच्या दरम्यान वैयक्तिक पणे कार्यक्रम (program) पुरविला जातो काय?

वरील प्रमाणे एकदा का निर्णय झाला तर आकलनात्मक अध्ययनाचे स्वरुप गृहित धरले जाते. लक्ष्य वेधी वापर करणाऱ्यांची सामाजिक – संस्कृती विषयाच्या निवडीवर परीणाम करेल. विषयाची व्यवस्था (रचना) करताना वापर करण्यार्यांच्या अध्ययनाच्या सवयी हया क्रमवार माहितीवर परिणाम करु शकतील. तसेच प्रत्येक पडद्यावरील (Screen) विविध माध्यमाद्वारे पुरविलेली गुणवत्तापूर्वक माहिती आणि संबंधीत यंत्रणेद्वारे पुरविलेली पूरक माहिती सुध्दा परीणाम करु शकेल. नेहमी उल्लेख केला जातो की कोणताही कार्यक्रम (Program) पूर्ण नसतो. किंवा स्वतःस पूरक पूर्णपणे नसतो. परंतु तो वापर करण्यार्यास परीणाम कारक माहिती पर्यंत पोहचवू शकतो. सॉप्टवेअर विकासकाकडे परीणामकारक जोडणी (link) असतात आणि विषय तज्ज्ञ योग्य शब्द योग्य ठीकाणी ठेऊन परीणामकारक माध्यम साहित्य विद्यार्थ्यांना स्वयं अभ्यास करण्यास उपयोगी पडेल असे असावे.

**अंतिम मूल्यमापन : (Terminal Evaluation)**

प्रोग्रॅम (कार्यक्रम) चा विकास पूर्ण होताच सॉप्टवेअर वापरासाठी मुक्त केला जातो. प्रत्यक्ष वापरणारे नंतर सूचना सुचवितात. आणि हया सूचना गोळा बेरीज केलेल्या (Summative) मूल्यमापनावर निर्धारीत असतात. (Summative) गोळा बेरीज केलेले मूल्यमापन हे पध्दतीच्या शेवटचे मूल्यमापन आहे. काही प्रोग्रॅम (कार्यक्रमामध्ये) पुष्कळ संघ (team) मोठया प्रमाणात सॉप्टवेअर मोठया भागाच्या विकास व वाढीसाठी असतात. व हे

उत्पादनाच्या अंतीम टप्प्यात एकत्र आणले जातात. आपण ज्यावेळी मायक्रोसॉफ्ट कार्यालय (office) काम करत असतो, त्यावेळी बहुसंख्य सुविधा देऊ केल्या जातात.

**उदा :**

आपण ज्यावेळी accessories वर क्लिक करतो त्यावेळी आपणास कॅलक्युलेटर व गेम इ. पुरविले जातात.

हे विविध गटाकडून वैयक्तिक तयार करुन घेऊन अंतीम एकत्र केलेले आहे. हयास अंतीम उत्पादन (Final Product) असे म्हणतात. गोळा बेरीज केलेले मूल्यमापन प्रत्यक्ष वापर करणाऱ्यास लक्ष्य बनविते. शैक्षणिक सॉप्टवेअर मध्ये मोठया प्रमाणामध्ये प्रौढांच्या अध्यापन शास्त्राच्या परिणामकारकतेच्या अभ्यासावर प्रामुख्याने भर दिलेला आहे. गरजांच्या वर्गीकरणामध्ये अध्ययन अध्यापनांच्या उदिदष्टांची ओळख करुन देण्यात आलेली आहे. हयाच आधारावर शालेय गोळा बेरीज मूल्यमापन सॉप्टवेअर असते. मूल्यमापन ही शैक्षणिक, करमणूक, यांचा साठा करते व हयाचा उपयोग भविष्यातील गोळा बेरीज मूल्यमापनासाठी होतो. किंवा रचनेचे महत्व लक्षात घेऊन केलेल्या गोळा बेरीज मूल्यमापनाच्या एकंदरीत अध्ययनावर परीणाम होतो. गोळाबेरीज मूल्यमापनाचे साधारणपणे सूचनेप्रमाणे मूलतः दोन भाग पडू शकतात.

१) कमी कालावधीचे सत्र (Short Term) आणि

२) जास्त कालावधीचे सत्र (Long Term) मध्ये प्रोग्रॅम मध्ये बदल असतात.

कमी कालावधी सत्रामध्ये (Short Term) बदल हे स्वतःच्या निरिक्षणावर आधारित असतात आणि अभिप्रय हा वापरणाऱ्याकडून असतो.

जास्त कालावधी सत्र (long term) बदल हे अभ्यासक्रम रचनेचा निर्णय आणि विकासक (Agency) संघटना कडून आलेल्या सूचनावर आधारीत असतो. तसेच ज्या संस्था / संघटना सॉप्टवेअरचा वापर जर संस्थे बाहेर करत असतील तर बाहेरील बदलाचा प्रभाव (Long Term) मध्ये पडतो.

## ६.६ सारांश

हया घटकामध्ये आपण सूचनात्मक रचनेच्या भूमिकेची दूरस्थ अध्ययनातील अभ्यासक्रम संक्रमणा बद्दल चर्चा केलेली आहे.

सूचनात्मक रचना ही उददेशाने प्रेरित कृतीशील उपक्रमशील योजना आहे. अध्ययन ही सिध्दांत हा कोणत्याही सूचनात्मक रचनेचा कणा (Back Bone) आहे. हयामध्ये नियोजन व मूल्यमापनाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या वैशिष्टयानुसार सूचनात्मक रचना (आराखडा) (अनुदेशन) (Industuction Design) तयार करतात. सूचनात्मक माध्यम देखील विद्यार्थ्यांच्या वैशिष्टयानुसार निश्चीत केलेले आहे. मूल्यमापन हे रचनेच्या नियोजनाच्या मूल्यमापनासाठी अत्यावश्यक आहे. मूल्यमापन सातत्यपूर्ण व शेवटी सुध्दा असावे.

## ६.७ स्वाध्याय

१) मुक्त दूरस्थ अध्ययनामध्ये सूचनात्मक रचनेचे (अनुदेशनाचे) महत्व वर्णन करा.

२) मुक्त दूरस्थ अध्ययनाच्या फायदा बरोबर मुक्त दूरस्थ अध्ययनामध्ये रचनेची गरज स्पष्ट करा.

३) वर्गीकरण पध्दतीच्या गरजेच्या पायर्याची उदाहरणाच्या मदतीने चर्चा करा.

४) सूचनात्मक पध्दतीच्या रचनेच्या पायर्यांची उदाहरणांच्या मदतीने चर्चा करा.

५) मूल्यमापनाचे विविध प्रकार सांगा. प्रत्येक मूल्यमापन प्रकाराचे चिकित्सक मूल्यमापन करा.

६) "मूल्यमापन पध्दतीची परीणामकारकता ही विद्यार्थ्यांच्या गुणधर्मावर आणि सूचनात्मक माध्यमावर आधारीत असते." हया विधानाची चर्चा करा.

❖❖❖❖

# ७

# अभ्यासक्रम विषयक घडामोडी वाढविणे

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ स्वंय अध्ययन साहित्य अभ्यासातील कौशल्ये

७.२.१ स्वंय - अध्ययन साहित्य रचना व कार्य

७.२.२ स्वंय - अध्ययन साहित्यातील कौशल्ये

७.२.३ अभ्यास कौशल्याचे महत्व

७.२.४ मोजमाप संकल्पना

७.२.५ वाचन कौशल्य व सर्वसमावेशकता

७.३ समुपदेशन व खाजगी शिक्षकांची शिकवणी

७.३.१ समुपदेशन म्हणजे काय

७.३.२ समुपदेशनाचे प्रकार

७.३.३ खाजगी शिक्षकांची शिकवणी

७.४ अभिप्राय यंत्रणा, स्वाध्याय व सत्र परीक्षा

७.४.१ अभिप्राय यंत्रणा

७.४.२ स्वाध्याय

७.४.३ सत्राच्या शेवटी परिक्षा

## ७.० उद्दिष्टे

हया घटकामध्ये आपण अभ्यास कौशल्यावर चर्चा करणार आहोत. ही स्वयं अध्ययन साहित्यामध्ये कशा प्रकारे उपयोगी आहेत.

हया घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्ही पुढील बाबी करु शकाल.

- स्वयं - अध्ययन साहित्याची व्याख्या विस्तृत अर्थाने कराल.

- स्वयं - अध्ययन साहित्याचा उपयोग कराल.
- स्वयं - अध्ययन साहित्यातील कौशल्ये समजून घ्याल.
- अभ्यास कौशल्याचे महत्व जाणून घ्याल.
- वाचन क्षमता अनुभवाल.
- समुपदेशन व खाजगी शिक्षकांची शिकवणी यांचा अनुभव घ्याल.
- अभिप्राय यंत्रणा व स्वाध्याय.

## ७.१ प्रस्तावना

अभ्यास संक्रमण हे विविध परीणामावर अवलंबून आहे. हयाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परीणाम अध्ययन व अध्यापन प्रक्रियेच्या गुणवत्ता सुधारण्यावर होतो. सद्या विविध पद्धती आणि प्रमुख्याने (ICT) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान हे स्वतः वर्ग खोली अध्यापन प्रक्रीयेमध्ये व मुलांच्या संपादनामध्ये पुढाकार घेते. परीणामकारक अभ्यास संक्रमण मध्ये मुख्यतः पुढील संबंध दर्शवितात.

१) अस्तीत्वामधील अभ्यासक्रम व त्याची व्याप्ती.

२) अभ्यासक्रम उजळणी आणि स्वाध्याय (घरचा अभ्यास)

३) साहित्यावर आधारीत क्षमता.

४) मुलांना उपलब्ध असलेली पुस्तके.

५) पुस्तकांचे उत्पादन आणि वितरण.

६) अध्यापनाची उपलब्धी.

७) अध्यापन साहित्य व त्यांचा उपयोग

८) वर्गखोली व्यवस्थापन (बसण्याची व्यवस्था व वर्गखोली ची सजावट)

९) अध्ययन व अध्यापन प्रक्रीया (प्रौढांचे अध्यापनशास्त्र)

१०) अध्ययन अध्यापना मध्ये मुलांचा स्वतःहून पुढाकार.

क) मूल्यमापन व वर्गामध्ये बारकाईने निरिक्षण

कोणत्याही अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपणास. विद्यार्थ्यांचे सूक्ष्म निरिक्षण, त्यांचे वय, त्यांचे पूर्व प्रशिक्षण किंवा शिक्षण, त्यांचे पूर्वज्ञान, त्यांची आवड, त्यांना महत्वाच्या वाटणाऱ्या (वस्तू) बाबी, त्यांची वैयक्तिक ध्येये व समस्या हयांचे अवलोकन गरजेचे आहे. सर्वसाधारणपणे विद्यार्थी त्यांच्या पूर्व ज्ञानावर व अनुभवाच्या आधारे वर्गात

येतात. चांगला अभ्यासक्रम पूर्व ज्ञानाचा उपयोग नवीन अध्ययनासाठी पाया म्हणून करतात. अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्यासाठी नवीन संकल्पनांची ओळख करुन देतो.

**अभ्यासक्रम संवर्धन / ज्ञानसंपन्न करणे म्हणजे :**

१) वास्तवीक जीवनातील अनुभव शाळा बाहयअनुभवाशी जोडल्यामुळे अध्ययन अर्थपूर्ण होईल.

२) पारंपारिक पध्दती पासून अध्ययन पध्दत बदलेली असावी सरावाद्वारे अध्ययनास प्रेत्साहन समस्या निराकरण, सर्जनशील विचारसरणी व निर्णायक विचारसरणी.

३) मुलांना पाठयपुस्तकाद्वारे माहिती वर प्रकाश टाकण्यापेक्षा मुलांच्या एकंदरीत विकास ज्ञानसंपन्न होईल असा असावा.

४) सर्व कार्यक्रमामध्ये लवचीकता निर्माण करणे गरजेचे आहे. मूल्यमापन हे सुध्दा लवचीक व वर्गातील जीवनामध्ये एकात्मीक असावे.

५) विद्यार्थ्यामधील वैयक्तिक फरक आवड व क्षमता याप्रमाणे अभ्यासक्रम विद्यार्थी केंद्रीत असावा. तसेच अभ्यासक्रम गरजांवर आधारित व मूल केंद्रीत (विद्यार्थी केंद्रीत ) असावा.

६) अभ्यासक्रमाची व्याप्ती विविध विषयांनी संबंधित व विविध विषयाशी एकात्मीक असावी.

७) अभ्यासक्रम परिणामकारक व उपयोगी असावा. अध्ययन करताना येणारा अनुभव अभ्यासक्रमातून देणारा असावा.

८) अभ्यासक्रम उद्बोधनपर व उपक्रमशील असावा. अभ्यासक्रमाची रचना, व दर्जा, शैक्षणिक अनुभवाशी सुसंगत असावा.

## ७.२ स्वयं - अध्ययन साहित्यामधील अभ्यास कौशल्ये (Embeding Study Skills in SLM)

### ७.२.१ रचना

स्वंय - अध्ययन साहित्य हे विषयांशी संबंधीत तुमच्या समोरील अवघड शंका, कठीणपणा (Difficulties) सामोरे जाण्यासाठी साधन आहे. म्हणून वर्गात (शिकवत) अध्यापन करत असताना तुमच्यासमोर समस्या येत नाही. जरी ही बाब शिक्षकांनी स्वतः ओळखली असेल तरी देखील शिक्षक वर्गात अध्यापन करीत असताना जो भाग अध्ययन साहित्यामध्ये समाविष्ट झालेला नसेल त्या त्या विषयीची शंका समस्या येवू शकते. स्वयं - अध्ययन साहित हे दूरस्थ अध्यनामध्ये महत्वाचा भाग आहे. प्रत्येक घटकाची सुरवात प्रस्तावनेने होते. उद्दीष्टे आपणास ज्ञान (knowledge) बद्दल सांगतात. हया घटकाचा अभ्यास केल्यानंतर अध्ययन प्रक्रिये मध्ये काय परिणामकारक बददल होतील हयाची माहिती

आपण जमा करु शकतो. प्रत्येक भागामध्ये व उपभागामध्ये किंवा प्रत्येक घटक व उपघटकामध्ये “स्वतःतपासून” करावयाचे स्वाध्याय दिलेले आहे. प्रश्नांची उत्तरे लिहाण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. हे प्रश्न पुस्तकातील घटकातील संदर्भात असतात. काही जण लहान लहान स्वाध्यायांचा अभ्यास करुन पुढे जातात. योग्य समास किंवा जागा नोटस लिहण्यासाठी पानावर ठेवलेली असते. म्हणून हया द्वारे आपली कौशल्ये व ज्ञान (वाढवू) संर्वधन करु शकतो.

योग्य चित्रेपुरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच आकृत्या, हस्तपुस्तीका उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. हयामुळे विद्यार्थ्यांना परीणामकारक अध्यापन करता येईल. घटकाच्या शेवटी मुख्य मद्दयांच्या स्वरुप सारांश आपण काय शिकलो आणि स्वाध्याय आणि त्यांची स्वतः तपासीत उत्तरे दिलेली आहेत. हया प्रश्नांची उत्तरे लिहून ती स्वतः तपासावीत असे अपेक्षीत आहे.




**आ.१ स्वंय-अध्ययन अभ्यासातील कौशल्ये**

हया प्रश्नांचा अर्थ म्हणजे केवळ प्रगती तपासावयाची नसून अभ्यास साहित्याची परीणाम कारकता व उपयोग वाढवला पाहिजे.

### ७ २.२ स्वयं अध्ययन साहित्यातील अभ्यास कौशल्ये

विविध गरजांच्या प्रमाणे, विविध विचारवंताची अभ्यास कौशल्याचा विविध व्याख्या केलेल्या आहेत. अभ्यास कौशल्यांचा संदर्भात काही शीर्षक पुढील प्रमाणे.

१) हत्यारे (अवजारे) संच (Tool Kit)

२) ज्ञान गोळा करण्याचे चांगले मार्ग

३) संघटनात्मक कौशल्यांचा संच

४) सूक्ष्म कौशल्ये

५) पध्दतशीर अभ्यास करावयाच्या पध्दती.

६) आणि इतर.

अभ्यास कौशल्यासाठी विद्यार्थ्यांने त्यांच्या पध्दती विकसीत जास्तीत फायदा मिळवण्यासाठी विकसीत करणे गरजेचे आहे. हया त्यांच्या कृतीची गरज आहे. उदा – ऐकणे, बोलणे, वाचने व लिहिणे. इ. इतर कौशल्ये म्हणजे "प्रगत कौशल्ये" ही पूर्णपणे यांत्रीक नाहीत परंतु हयासाठी सर्जनशील विचारांचा समावेश अत्यावश्यक आहे. ही कौशल्ये विद्यार्थ्यांच्या मानसीक स्वाध्याय संपादनाचाच भाग आहेत. ही अत्यावश्यक कौशल्ये त्याला/ तिच्या अभ्यासापासून जास्तीत जास्त फायदा मिळवण्यासाठी गरजेची आहेत. अभ्यास कौशल्य पध्दतीच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यास प्रभावी होण्यास मदत होते तसेच विद्यार्थ्यांना वैयक्तीकपणे आपली अभ्यासाची पक्कड अभ्यास साहित्याबरोबर वैयक्तीपणे घट्ट आणि परिणाम कारक करता येते. सर्व विद्यार्थी त्यांचे संदेश (message) किंवा संदेशाचे सांकेतिक भाषामध्ये रुपांतरण करण्यासाठी कोणत्या प्रकारची कौशल्ये वापरावी हे जरा कठीणच आहे.

**"अभ्यास" ही संज्ञा पुढीलप्रमाणे संबंधीत आहे.**

- कोर्स व्याख्यानाचे अनुकरण करा व नोटस द्या.
- जे (शिकविण्याचे) अध्यापन करावयाचे आहे त्या विषयासंबंधी अत्यावश्यक माहीती सतत संपादन करणे.
- विषयातील संपूर्ण प्रकरणांचा अभ्यास.
- सर्मपण भाव, पध्दतशीरपणे समजून घेण्यासाठी पाठपुरावा किंवा एखाद्याच्या विचारांशी सर्मपण भावना अभ्यास अध्ययनामध्ये पुढील हेतू व पध्दत स्थिरीकरण करतात.

१) समस्या निराकरण

२) चाचणी परीक्षेद्वारा वाटचाल

३) माहिती गोळा करणे.

४) प्रत्यक्षात वस्तुस्थितीची तुलना

५) (Suggestion) सुचविणे.

६) दृष्टीकोन व्यक्त करणे.

७) सुचना गृहीत धरुन सत्याचा पुरावा पाहणे.

“अभ्यास” अशा प्रकारे केवळ तुमच्या संकल्पनांचे वर्गीकरण आणि चिकीत्सा होते असे नाही. तर इतर लोकांकडून तुम्ही जे व्याख्यानामध्ये किंवा चर्चेमध्ये ऐकता किंवा पुस्तकामधून ऐकता त्यांचे वर्गीकरण व चिकित्सा होते. तुम्ही पुढे जाऊन तुम्हास (लक्षात) आठवणीत राहण्यासाठी (summarizes) थोडक्यात महत्वाचे तुम्ही काय वाचणार व तुमचे विचार कसे स्पष्ट होतील अशा नोटस तयार करा.

**अभ्यास कौशल्ये आणि दूरस्थ अध्यापन / अध्ययन**

अभ्यास कौशल्ये खूप अत्यावश्यक आहेत. शिक्षक व विद्यार्थी हे अध्ययन / अध्यापन अंतराने खूप लांब आहेत. हयासाठी अभ्यास कौशल्ये अत्यंत आवशक्य आहेत. हयाचा अर्थ दूरस्थ शिक्षणामध्ये दूरस्थ विद्यार्थ्यांची अभ्यास कौशल्यामध्ये सुधारणा होते. अभ्यास पध्दतीची दूरस्थ शिक्षणामध्ये महत्वाची भूमीका आहे. अध्ययन शिक्षकापासून व संस्थापासून दूर आहेत, हे त्याच्या / तिच्या अभ्यास व अभ्यास साहित्यवर अवलंबून आहे. जर तो / ती योग्य प्रकारे पुस्तकाचे स्पष्टीकरण करण्यासाठी अभ्यास कौशल्ये विकसीत करत नसतील तर निश्चीतच त्यांना तोटा आहे. दूरस्थ विद्यार्थ्यांचा अभ्यास हा दृक-श्राव्य (AUDIO-VIDEO) साहित्यावर अवलंबून आहे. पुन्हा ती कशा प्रकारे अर्थपूर्ण तर्क काढतात किंवा कार्यकारण भाव पाहून अनुमान काढतात. हयापैकी प्रथमिकपणे अभ्यास पध्दत कशी विकसित करतो हयावर अवलंबून आहे.

### ७.२.३ अभ्यास कौशल्याचे महत्व (Significance of study skills)

विद्यार्थी त्यांच्या कमजोर अभ्यास पध्दती विकसीत करण्यापूर्वी किंवा अभ्यासासंबंधी चुकीच्या संकल्पना ग्रहण करण्यापूर्वी त्याने चांगल्या अभ्यास सवयी संपादनामध्ये मदत केली पाहिजे. विद्यार्थ्यांचा वेळ कमी खर्चीक असणारे अध्यापन अभ्यास कौशल्य असावे आणि अधिक शिकण्यास प्रवृत्त करणारे असावे. अभ्यासामध्ये विशिष्ट प्रकारचा ताण, एकाग्रता व ठराविक दिशा असणे गरजेचे आहे. अर्थातच वैयक्तिक ताण वेगवेगळा व्यक्तीवर अवलंबून आहे.

चांगल्या अभ्यास सवयी विकसित करण्यासाठी तीन मुख्य बाबी संबंधित आहेत. त्या पुढीलप्रमाणे .

१) अभ्यास केव्हां करावा?

२) अभ्यास कोठे करावा?

३) अभ्यासावर किती वेळ खर्च करावा.

**अभ्यास केंव्हा करावा (When to study)**

काही विद्यार्थीं अंतीम परिक्षेच्या वेळी किंवा परिक्षेच्या घोषणेच्या वेळी अभ्यास सुरु करतात. काही विद्यार्थी संपूर्ण रात्र अभ्यास करुन घोकंपट्टी करतात. अशा प्रकारचा अभ्यास शक्यतो एकदाच किंवा दुसर्यांचा करतात. तथापी अशा प्रकारचे घोकंपट्टी करणारे अध्ययन वास्तविक अध्ययन होत नाही.

चांगला विद्यार्थी आपल्या अभ्यासाच्या वेळेचे नियोजन करतो. व संपूर्ण वेळेत तो अंमलात आणतो. अर्थातच त्याची अभ्यासाची क्षमता अधिक असतो. म्हणून अभ्यासाच्या नियोजनाची सवय, क्षमता जन्मापासून नसते. हा एक कौशल्याचा संच आहे. तो आपण आवश्यक शिकला पाहिजे. अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करण्यास भाग पाडणे ही मोठी जबाबदारी आहे. नियमित अभ्यास मुलांची द्वीधा अवस्था (गोंधळ) नाहीसा करतो हे विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी अनुभवले पाहीजे. हयाची मदत त्यांना विद्यार्थी काय अभ्यास करणार आहे हयाचे आयोजन करण्यामध्ये होतो.

वर्गखोली, परिस्थिती मध्ये उदा- समजा विद्यार्थ्यांना प्रत्येक विषय शक्य तितक्या लवकर अभ्यास पूर्ण करण्याचा सल्ला वर्ग चालू असताना किंवा वर्ग संपल्यावर करण्याचा दिला. हे पूर्णपणे वर्ग नियमित सुरु असतात की नाही हयावर अवलंबून आहे. जर एखादे व्याख्यान अभ्यास क्रमाची सरळ माहिती देणारे असेल तदनंतर ते व्याख्यान ( महत्वाचे लिखाण) नोटसच्या उजळणी साठी उपयोगी पडू शकते आणि आपल्याला ते समजले आहे का हे जाणून घेऊ शकतो. अभ्यास सत्र फक्त परिसंवादापूर्वी / पार्श्वभूमीच्या माहितीवर आधारीत वाचन करण्याची किंवा अभ्यासा संबंधी मुले चर्चा करतात. हयामुळे मुलांचे वर्गामध्ये परीणाम कारक योगदान होईल.

**कोठे अभ्यास करतो. (where to study)**

सर्वसाधारणपणे तुम्ही कोठेही शांत ग्रंथालयामध्ये किंवा गर्दीच्या ठिकाणी बस स्थानक व रेल्वेस्थानकावर अभ्यास करु शकतात. परंतु आपण वास्तवा मध्ये येवू या. आपल्यापैकी बहुतेक जण अशा वातावरणामध्ये मनास एकाग्र करु शकत नाहींत. अभ्यासाचा अंमलबजावणीसाठी अभ्यासाचे ठिकाण शक्य ते अशा गोंधळाच्या वातावरणातून मुक्त विद्यार्थ्यांचे मन विचलीत होणार नाही असे असावे. अभ्यासासाठी परिस्थितीची अट म्हणजे अभ्यासाच्या ठिकाणी भरपूर सूर्यप्रकाश, हवा (वायूजीवन) मोकळी हवा (ventilated) जास्त गरम नाही व जास्त थंड नाही असे असावे. हया ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो की विद्यार्थ्यांना इच्छीत व त्यांच्या मनासारख्या वस्तू मिळणे तसे अवघड आहे.

उदा- विद्यार्थी वसतीगृहात (Hostel) मध्ये राहत असेल किंवा एखाद्याच्या घरी राहत असेल तर त्याला / तिला त्याच्या आवडी निवडी प्रमाणे सर्व वस्तू मिळणार नाही.

आता आपल्या अभ्यासाच्या वेळी शारीरीक स्थिती कशी असावी हयाचे ज्ञान असले पाहिजे. उत्तम स्थिती म्हणजे अभ्यासाच्या वेळी, टेबल, बाक किंवा बीछान्यावर अभ्यास करताना ताठ व सरळ बसावे. असे बसल्याने एकाग्रता वाढते. परंतु बिछान्यावर आडवे झाला की आळस वाढतो व झोप येते. आराम खुर्ची सुध्दा अपेक्षीत परिणाम मिळत नाही. म्हणून अभ्यासाची जागा आल्हाददायक स्वच्छ व प्रसन्न वातावरण देणारी असावी. त्याचबरोबर शरीर व मन देखील तंदुरुस्त (Healthy) असावे.

**अभ्यासावर कशा प्रकारे वेळ खर्च करणार (How much time to spend on your study)**

तिसरी व महत्वाची पायरी म्हणजे अभ्यास करण्यासाठी किती वेळ देणार हे निश्चित करणे. हे ज्ञान आहे विषय कोणता आहे व विषयाचे ज्ञान किती आहे हयावर वेळेची निश्चिती

अवलंबून आहे. विशिष्ट विषयास (इतकाच) एवढाच निश्चित वेळ दिला पाहीजे. असा काही पक्का नियम नाही. अभ्यासाचा वेळ पुढील बाबीनुसार बदलत असतो.

१) ज्यावेळी उपक्रमांचा वैयक्तिकपणे एकंदरीत सतत सराव अध्ययन होत असेल तेव्हा.

२) स्वाध्याय.

३) ज्यावेळी ते विचार करतात की त्यांना अध्ययन करावयाचे आहे.

### ७ २.४ मोजमाप संकल्पना (Conccept Mapping)

ज्यावेळी विद्यार्थी अभ्यास करतात ते त्यांचा साहीत्याचे सादरीकरण आलेख तक्याच्या स्वरुपात करु शकतात. तसेच ते सद्या अभ्यास करत असलेल्या किंवा पुढे अभ्यास करावयाच्या साहित्याचे आलेख स्वरुपात सादरीकरण करु शकतात. हया “संकल्पना तक्ता“ सादरीकरण त्यांनी काय अभ्यास केला व चांगल्या संकल्पना तयारीसाठी पध्दतशीर (नकाशा) माप ची गरज आहे. ज्यामुळे विद्यार्थी निर्णायक / चिकित्सक विचारवंत बनतील कारण :

अ) ते रुपरेखा काय स्वरुपाची आहे हयावरुन ते अंदाज घेवू शकतील.

आ) त्यांना ज्याची मदत होईल आणि ते ज्या मार्गाने जाणार आहेत हया माहिती साठी उत्कृष्ठ शब्द व वाक्यरनांची पुर्नसादरीकरण करणे.

इ) त्यांना माहिती गरज असेल त्यावेळी पुन्हा माहितीसाठी (recall) बोलावणे मोजमाप संकल्पना Concept Mapping ही पध्दत फार उपयोगी असून विद्यार्थ्यांना ही अर्थपूर्ण अध्ययनाकडे घेऊन जाते.

(Ausubel) ॲसूबोल सुचवितो की ज्यावेळी अर्थपूर्ण अध्ययन घडून येते, त्यावेळी आपल्या संपूर्ण आकलनात्मक रचनेमध्ये भरपूर प्रमाणात बदल घडून येतात. तसेच पूर्वीच्या संकल्पना मध्ये सुधारणा होते. आणि संकल्पनामध्ये नवीन जोडणी (Link) प्रस्थापित होते. म्हणून विद्यार्थी ( शिकणारा) उपयोग पुढील प्रमाणे करु शकतो.

१) अभ्यासासाठी माहिती निवडा व ती निश्चित करा.

२) अभ्यासासाठी निवडलेल्या साहीत्याचे संपूर्ण वाचन करा.

३) मध्यवर्ती कल्पना प्रस्थापित करा / कोणता घटक वाचावयाचा आहे.

४) प्रत्येक परीच्छेद पुन्हा वाचा. हयामुळे त्यांना परिच्छेदातील मुख्य भाग समजून घेण्यास मदत होईल.

५) मध्यवर्ती कल्पना नमूद करा. आणि परिच्छेदातील मुख्य भाग सहज सोप्या स्वरुपात अभ्यासणे हयालाच Concept Map संकल्पना नकाशा म्हणतात.

संकल्पना नकाशा योग्य रचनेचा मार्ग म्हणजे, रुपरेषा नोटस् घेणे / तयारी करणे / आढावा घेणे.

**रुपरेषा (Outline)**

हे विद्यार्थ्यांना लांबचे आयोजना मध्ये मदत करते. तसेच लिखित निबंध स्वाध्याय प्रतिसाद हयांचा आयोजनामध्ये मदत करते. रुपरेषा अभ्यास उददीष्टासाठी सुध्दा उपयोगी आहे. कारण ही साहित्याच्या तात्वीक व्यवस्थेची मार्गदर्शनपर सेवा देते. म्हणून विद्यार्थ्यांनी Outlining रुपरेषा (शिकली) अध्ययन केलीच पाहिजे. दिलेल्या परिच्छेदामधून मुख्य भाग व उपभागावर शिक्षक प्रश्न विचारुन उपक्रम देऊ शकतात.

**महत्वाचे टीपण तयार करणे (Note Making)**

विद्यार्थ्याना अध्ययनामध्ये अधीक चांगल्या प्रकारे मदत करण्यासाठी हे एक उत्तम अभ्यास कौशल्य आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना महत्वाची माहिती महत्वाचे टिपण ( नोटस) घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना देतात व नोटस कशा घ्यायच्या हयाचा सराव देतात. नोटस नेहमी चांगल्या शब्दांचा व वाक्प्रचारांचा उपयोग करतात जेणे करुन (Points) मुद्दे विद्यार्थ्यांच्या चटकन स्मरणात राहतील. त्यांना पूर्ण वाक्यांची गरज नसते. नोटस व्याख्यांन (Lecture) ऐकत असताना किंवा पाठयपुस्तक वाचत असताना व्हीडीओ कार्यक्रम पहात असताना चर्चेद्वारा सराव करताना, विषयाशी संबंधित विचार करत असताना घेतल्या जातात.

**आढावा किंवा सारांश  (Summarizing)**

आढावा किंवा सारांश अध्ययन साहित्य हा एक अध्ययन प्रकार विद्यार्थ्यांना महत्वाच्या संकल्पना आणि घटकातील वस्तुस्थिती/ धडे/ लांब परीच्छेद हयामध्ये मदत करतो. अत्यावश्यक माहितीचे नियोजन करण्यासाठी त्यांनी काय वाचले पाहिजे हया विषयी विचार करण्यास भाग पाडतो.

**आकृती २   संकल्पना माप (नकाशा) Concept**






**आकृती ३ संकल्पना माप (नकाशा) उदाहरण (Example of Concept Map)**

दूरस्थ विद्यार्थी पुष्कळ अभ्यास कौशल्ये विकसित करतात.

१) संदर्भापासून शब्दांच्या अर्थांची निश्चिती करणे.

२) मुख्य कल्पना शोधणे.

३) निष्कर्ष काढणे.

४) कारणे ओळखणे.

५) वर्गीकरण ओळखून संबंधाच्या परिणामाचा सर्वसाधारण दृष्टीकोन बनविणे.

**७ २.५ वाचन, कौशल्ये आणि सर्व समावेशकता**

सर्वसाधारणपणे अभ्यास कौशल्ये ही वाचन व लिखाण हया उपकौशल्याशी सहयोगी असतात. वाचन ही एकूण एकात्मक प्रक्रिया आहे हया मध्ये प्रमुख्याने अध्ययनाचे तीन मुख्य विचार क्षेत्रे समाविष्ट आहेत.

१) ज्ञानाने आकलनीय (Cognitive)

२) आकलनशक्ती (Perceptual)

३) परीणामकारक (Affective)

**१) ज्ञानाने आकलनीय विचारक्षेत्र (Cognitive Dpmain)**

वाचक सतत पुस्तकाशी आंतरिक्रया करत असतात. जेणे करुन लेखकास संदेश मिळेल. आम्ही असे सूचीत करतो की वाचन ही विचारांची कला आहे. ज्या विद्यार्थ्यांना

आकलनाच्या विविध स्तरावर कठीणपणा (अवघडपणा) येतो म्हणजे ते काय वाचन करतात त्या वाचनाच्या सर्वसमावेशकते मध्ये अवघडपणा वाटतो. ते स्वतःस निवड, रुपांतरण, आयोजन आणि स्मरणात ठेवणे हया माहिती मध्ये समाविष्ट होत नाहीत. वाचकाला ते भूतकाळातील अनुभवाचे काय वाचत आहेत, माहितीचे स्पष्टीकरण काही इतर माहितीकडे दुर्लक्ष करणे, काही माहीतीसाठी (हजर) उपस्थित राहणे. वाचणाऱ्या जवळ वरिल असणे गरजेचे आहे.

आकलनात्मक विचारक्षेत्र अशा प्रकारे सर्वसमावेशक कौशल्ये समाविष्ट करतात. शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांची विचार कौशल्ये विकसित करण्यास मदत करु शकतात. शिक्षक नवीन पध्दती आणि नवीन पध्दतींचा सराव करुन घेऊन विद्यार्थ्यांना मदत करु शकतात.

**परीणामकारक विचारक्षेत्र :**

"परीणामकारक" संज्ञा अर्थात्मक संवेदनेने किंवा विशिष्ट भागाच्या प्रेरणेने आयोजनाची क्षमता." अशी व्याख्या केली जाऊ शकते. आपली पार्श्वभूमी, अनुभव, आणि आपल्या परीणामकारक संवेदनांचे आपल्याच प्रेरणेने आयोजन. ही परीणामक विचारक्षेत्रे आहेत.

दिसणारी परीणामकारकता ही खूप महत्वाची बाब आहे. डोळ्यांची हालचाल पध्दत परीणाम करते. आणि वाचक काय ज्ञान प्राप्त करतो हयावर नियंत्रण ठेवतात.

सर्वसाधारणपणे विद्यार्थी कशा प्रकारे शब्दांचे आकलन संपूर्णपणे किंवा वैयक्तिक पत्रे तो/ ती एकतर चांगला वाचक/ वाईट वाचक संबोध शकतात. ज्ञानेंद्रियाचा गुरु, अध्यापकीय प्रक्रिया ही सुध्दा परिणामकारक बाब आहे. उदाहरणार्थ जर वाचकाचा कल विषयांचा भागाकडे असेल तर तो/ ती जे काही वाचले असेल त्यातील काही भाग काढून टाकतो. (Delete) भर घालतो.

लिहलेल्या शब्दांचे सांकेतिक भाषेत रुपांतरण आणि पाठयपुस्तकातील आंतरिक्रिया मुख्यतः खालील घटकावर अवलंबून असतात.

**१) प्रेरणा :**

प्रेरणा हा प्रयत्नपूर्वक घटक, माहीत नसलेल्या भागांची ओळख करुन घेण्याची गरज, किंवा विशिष्ट भाग, शब्द जाणून घेणे.

**२) लक्ष (attention) अवधान :**

शक्तीशाली निवडणारा म्हणून किंवा सूक्ष्म प्रेरणा.

**३) समूहाची प्रेरणा :**

अभ्यासक्रमाची ओळख आणि इतर प्रकारामध्ये मर्यादीत काळासाठी (लक्ष) अवधान चा कमीत कमी वापर.

**४) विरुध्द (Contrast) :**

विरुध्द अक्षरांच्या प्रकारामुळे विरुध्द आवाजाचे ( सादरी करण ) निर्माण होते.

**५) अभिप्राय (Feedback) :**

परिक्षेच्या वेळी मर्यादीत प्रक्रीयेमध्ये अक्षरसमूहापासून बनलेल्या लिखीत शब्दापासून ते आपण बोललेल्या ध्वनी शब्दांची प्रितिक्रया म्हणजेच अभिप्राय होय. उदा.

शब्द कौशल्याचा वापर शांत वातावरणामध्ये वाचन करताना लिखित शब्दांच्यामधे ज्ञानाचे आकलन होते.

**परिणाम कारक विचारक्षेत्र :**

हया विचारक्षेत्रामध्ये आपल्या भावना, जाणीव व प्रयत्न यांचा समावेश होतो. परीणामकारक घटकामुळे आकलनात्मक ज्ञान प्राप्ती होते.




**आकृती ४ – वाचनाची तीन विचारक्षेत्रे**

बॅरेटच्या मते वाचनाची सर्व समावेशकता हा एक पध्दतशीर नमुना (model) आहे. हा नमुना प्रथमिक (खालच्या स्तरापासून ) ते उच्च शिक्षणापर्यंत उपयोगी आहे. तो पुढील प्रमाणे.




**आकृती ५ वाचनाचे स्तर**

शब्दांच्या ओळखी शिवाय कोणतेही वाचन करता येत नाही. बहुसंख्य उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी शब्द ओळखण्यामध्ये कुशल (mastered) असतात. शब्द हा वाचता येण्यासारखा, समजून घेण्यासारखा व अध्ययनास उपयुक्त असावा. प्रत्यक्ष वस्तुस्थिती मध्यवर्ती संकल्पनासाठी साक्षर सर्वसमावेशकर्ते वाचनाची काही महत्वाची उपकौशल्ये समाविष्ट आहेत. वाचणास तो / ती अर्थात्मक अर्थाने समजून घेण्याची गरज आहे.

**वाचन कौशल्ये मध्ये (SQ 3R ) तंत्रे –**

SQ ३R मूळ अक्षरे पाच स्तर आहेत. ती पाठयपुस्तकाच्या अभ्यासाठी घेतलेली असावीत.

१) निरिक्षण (Survey)

२) प्रश्न

३) वाचन

४) पुन्हा बोलणे (Recall)

५) आढावा (Review)

(Survey) सर्व्हे (निरिक्षण) संबंधित – लगेचच शीर्षक चे पान, पसंती, प्रकरणातील महत्वाचा भाग इ. पाठयपुस्तकाच्या भागामध्ये समाविष्ट पुढीलप्रमाणे :

१) सर्वसाधारण विषय क्षेत्र

२) लेखकाचे नाव

३) साधनांचा स्तर, माहिती आणि प्रकाशनाचे ठिकाण

**प्रश्न : (Queston)**

प्रत्येकजन त्याने / तिने स्वतःशीच प्रश्न विचारले पाहिजेत.

- मी हया पुस्तकावर कशा प्रकारे अवलंबून आहे?
- पुस्तक मला मदतनीस होऊ शकते काय? किंवा पसंतीची सूचना मिळू शकेल काय?
- संपूर्ण प्रकरणामध्ये लेखक समर्पण करणारा का असावा?

**वाचन (Read) :-**

पाठयपुस्तकातील वाचन साहित्याची मागणी निर्णायक मनाची (mind) असते. ज्यावेळी आपण पाठयपुस्तक वाचतो आपण आपले मन निर्णाय कौशल्याबरोबर वापरले पाहिजे. अन्यथा आपण जे सक्रीय वाचन करतो त्याचे योग्य उत्तर देऊ शकणार नाही.

**पुन्हा बोलावणे (Recall) :**

नियमितपणे पुन्हा बोलवण्याच्या प्रयत्नामुळे तुमचे अध्ययन तीन प्रकारे सुधारु शकते.

१) एकाग्रतेमध्ये सुधारणा करण्यामध्ये मदत

२) चुकीच्या प्रक्रियेमध्ये उपाय शोधण्याची तुम्हास सुसंधी.

**आढावा (Review) :**

आढावा घेण्याचा मुख्य उददेश म्हणजे पुन्हा बोलविण्याचा रास्त पणा निर्धारित वेळे मध्ये तपासणे. हयाचा उत्तम मार्ग म्हणजे खालील चार पायर्यांची पुन्हा पुन्हा उजळणी (Repect) करणे.

हया चार पायऱ्या म्हणजे – सर्वे, प्रश्न, वाचन आणि पुन्हा बोलावणे. (Recall)

वाचन हे दुय्यम  भाषा कौशल्य आहे. हयास विस्तारित अनुदेशनाची गरज आहे. आणि हे प्रथमिक भाषा संभाषण कले पेक्षा वेगळे आहे. प्रथमिक भाषा कौशल्य नैर्सर्गिक आहे. हयामध्ये चिन्हांचे (अर्थ सांगणे) स्पष्टीकरण आणि जुलमी चिन्हे जबरदस्तीने निर्माण करतात आणि संप्रेषणासाठी वापरतात. कित्येक अभ्यासांनी वाचनाची क्षमता दाखवून दिलेली आहे. आणि दृष्ट उपदेश (ज्ञान) जवळून आंतरसंबंधित आहे.

सर्वसमावेशकता हे आकृती कौशल्य आहे. (Multi dimension skill) हयामध्ये भाषा, ज्ञानेंद्रीये, आकलन आणि प्रेरणेचा भाग आहे. छापील पानांचा अर्थ समजून घेणे किंवा सर्व समावेशक पुस्तकाचा भाग उच्च प्रक्रियेमध्ये जास्त संख्येने कौशल्याचा समावेश होतो. सर्वसमावेशक वाचन हे संयुक्तीक कौशल्य आहे. हयामध्ये जोडलेल्या दृथ्यात्मक चिन्हांचा अर्थ आणि एकत्रित चिन्हांनी संप्रेषित केलेला व परीच्छेदामधील सादर केलेला संदेश समजून घेणे गरजेचे आहे. हयास कांही विशिष्ट भाषा स्तरांची गरज आणि कौशल्ये समजून घेण्याची गरज असते, कारण –उच्च प्रतीच्या कार्यप्रणाली संक्षीप्तीकरण आणि तर्कशक्ती हे होय. ज्यावेळी वाचक काही तरी काढून टाकतो त्यावेळी सर्वसमावेशकतेची प्रक्रिया घडून येते. किंवा दृश्य माहितीने पर्यायी अर्थ व्यक्त करतात. प्रौढ वाचक सर्वसमावेशकते मध्ये स्वतःस कार्यरत ठेवतात. म्हणून सर्वसमावेशकता ही एक हेतूपूर्वक कृती आहे. हे मुलांमध्ये जागृती वाढवू शकते. विद्यार्थ्यांची सर्वसमावेशकते विषयी जागृती त्यांची पुस्तकांमध्ये सर्वसमावेशक मध्ये सुधारणा वाढेल.

**आपली प्रगती तपासा**

खाली दिलेल्या जागेत प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) दूरस्थ मुक्त अध्ययन पध्दतीमध्ये स्वयं – अध्ययनाचे महत्व का आहे?

२) अभ्यास कौशल्याचे महत्व थोडक्यात लिहा?

३) “संकल्पना मोजमाप” म्हणजे काय?

४) वाचन कौशल्य आणि सर्व समावेशकता कशा प्रकारे अभ्यास कौशल्यावर परीणाम करतात?

## ७.३ समुपदेशन व खाजगी शिक्षकांची शिकवणी

चांगला शिक्षक नेहमी चांगला समुपदेशक असतो कारण समुपदेशन हा यशस्वी अध्यापन पध्दतीचा एक भाग आहे.

**अध्यापन :**

शिक्षकाने कोर्सला मध्यवर्ती ठेवून संप्रेषण शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थ्यांकडून समुपदेशकाकडे खूप गरजेचे आहे.

**समुपदेशन :**

पर्यायाने विद्यार्थी केंद्रीत संप्रेषण हे विद्यार्थ्यांच्या सभोवताली विद्यार्थ्यांकडून समुपदेशकाकडे घडून येते. समुपदेशक एक चांगला ऐकणारा असावा.

दूरस्थ शिक्षणामध्ये समुपदेशकाची वैशिष्टये आहेत व दूरस्थ अध्ययन व संस्थेची सुध्दा विशिष्टये आहेत.

**दूरस्थ विद्यार्थ्यांची वैशिष्टये :**

- इतर विद्यार्थी व संस्थापासून किंवा दोन्ही पासून अलग असू शकतात.
- पूर्व शैक्षणिक अनुभव सकारात्मक किंवा नकरात्मक असू शकतो.
- कामावर व घरी भरपूर वेळेची बांधीलकी आहे का?
- शैक्षणिक व व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारच्या किंवा इतर विस्तृत पार्श्वभूमीमधून आलेला असू शकतो काय?
- तुमच्या  वास्तवातील गरजा पुरविण्यासाठी कोर्स चा योग्य स्तराची वचनबध्दता असू शकते का?

**संस्थेची वैशिष्टे**

विद्यार्थ्यास वैयक्तिक सेवा देण्यासाठी व त्यासाठी मदतीसाठी आणि पध्दतीमधील समस्या निराकरणासाठी समुपदेशन फार महत्त्वाचे आहे. ज्या संस्थांनी प्रादेशिक नेटवर्क सेवा विकसित केलेल्या आहेत त्यांची कार्यालये विद्यार्थ्यापासून सुमारे (१००) शंभर मैलावर आहेत.

परंतु आपल्या देशामध्ये ज्या ठिकाणी संप्रेषण खूप कठीण आहे अशा मागासलेल्या भागामध्ये कोर्स साहित्य पाठविण्यामध्ये उशीर होऊ शकतो समस्या येवू शकतात.

संस्था विविध प्रकारचे कोर्स चे साहित्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. तसेच ते विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे परिणामकारक, लवचिक जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना समावून घेणारी उत्कृष्ट प्रशासकीय सेवा व विद्यार्थी आधार सेवा विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु हयांचा ज्यावेळी वैयक्तिक व्यवहार होतो त्यावेळी हया लवचीक नसतात.

**विद्यार्थी वैशिष्टये :**

विद्यार्थ्याने योग्य परिणाम कारक अध्ययन पध्दतीचा संच किंवा अभ्यास कौशल्ये आवशक्यपणे विकसीत करतात. काही विद्यार्थ्याकडे ही अगोदरच असतात. काहींना हयाची गरज असते. अशा प्रकारचे संपादन कौशल्ये आकलनात्मक असू शकतात. दूरस्थ अध्ययनाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना त्याची अभ्यासाची पध्दत वैयक्तिक पणे विकसित करण्यासाठी समुपदेशन हा एक लोकांना मदतीसाठी महत्वचा भाग आहे.

समुपदेशन निर्णय घेण्याच्या क्षणी योग्य ते मार्गदर्शन विद्यार्थ्यांस करु शकते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये निर्णय घेण्याचे क्षण विविध स्तरावर येतात. ते पुढीलप्रमाणेः

- कोर्ससाठी अर्ज करावा की नको.
- कोणत्या कोर्ससाठी प्रवेश घ्यावा.
- करीअरच्या कोणत्या शक्यता आहेत.
- माघार घ्यावी की पुढे चालू ठेवावे.
- वेळेचे समर्पण कुटूंब, काम व कोर्ससाठी कसे कराल असे निर्णय बर्याच वेळा घ्यावे लागतात.
- स्वाध्याय (घ्यावा) करावा की करु नये.
- (नोटस) टिपणी घेण्यासाठी कोणत्या पध्दतीचे अनुकरण करावे.
- खाजगी शिक्षकास ( शिकवणी मध्ये) प्रश्न विचारावेत की विचारु नये.
- निबंधाद्वारे पाठयांशाचा परामर्श घ्यावा की घेवू नये.

**प्रतिबंध (Barriers)**

विद्यार्थ्यांच्या प्रगती मध्ये विविध स्तरावर प्रतिबंध घडून येतो.

**अभ्यासाशी संबंधित (Study Related)**

निष्कर्ष बरोबर, परीमाण कारक अभ्यासाच्या मार्गाशी संबंधित, स्वाध्याय पूर्ण करण्यासंबंधी आणि परिक्षाजवळ आल्यावर.

**वेळे संदर्भात (Time Related)**

निष्कर्ष (Finding) किंवा वेळेचे प्रमाण पर्यायाने ठरविणे.

**वैयक्तीक (Personal)**

घरचे / चारीत्र्य ( करीअर) आर्थीक, आरोग्य तणाव इ.

**संस्था (Institutional)**

प्रतिबंधाची निर्मिती, शक्यतो हेतूपूरस्पर विरहित, संस्थेकडून – नियत्रिंत, पत्र व्यवहारामध्ये उशीर, इत्यादी.

महत्वाच्या मुदयाबाबत प्रतिबंध (Substanial barriers)

चुकीच्या वेळेचा प्रतिबंध समान अवघड (कठीण) असतो.

- खाजगी शिक्षक केलेले कार्य उशीरा परत करतो.
- खराब वेळेवर सुट्टी
- कामावर अतिरिक्त दबाव.

खाजगी शिक्षकाचे कार्य विविध प्रकारे होते. खाजगी शिक्षक व विद्यार्थी हया दोघांमध्ये अधिक समजून घेण्याची संपादणूक असावयास पाहिजे. खाजगी शिक्षकाने कोर्स संबंधित मुद्दे विद्यार्थ्यांना दाखवून देऊन विद्यार्थ्यांना मदत करण्याची क्षमता अंगी असावयास हवी. एका कोर्सचे ज्ञान इतर ठिकाणी रुपांतरणाची कला त्या शिक्षकांमध्ये असण महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांची जबाबदारी घेऊन त्यांना सर्वसाधारण समुपदेशन करणे खाजगी शिक्षकास शक्य आहे.

### ७ ३.१ समुपदेशन काय आहे? (What is Counselling)

"समुपदेशन" ही संज्ञा नैर्सर्गिकपणे वेगवेगळया लोकांसाठी वेगवेगळी असू शकते.

पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणामध्ये, साधारणपणे शिकवणी ही स्वाध्याय तयार करणे आणि त्याची पूर्तता करणे हया अर्थाने असतो. इतर काही प्रकारामध्ये वेगळया प्रकारचे संप्रेषण विद्यार्थ्यांमध्ये असू शकते. ते पुढील प्रमाणे :

- समोरासमोर अध्यापन
- दूरध्वनीद्वारे खाजगी शिकवणी
- ऑडीओ कॅसेट
- सद्य स्थितीत व्हीडिओ फोन द्वारे

- संगणक संप्रेषण (Computer Communication)
- इतर नवीन प्रचलीत साधनांद्वारे अधिक संप्रेषण असू शकते.

समुपदेशनामुळे विषयाशी संबंधित नसलेल्या विद्यार्थी व संस्था यांच्यातील आंतरिक्रया समजून येतात. अशा समुपदेशन कार्य (तत्व) हयामध्ये दूरस्थ अभ्यास व (पार्ट टाईम) अंशकालीन अभ्यास संबंधी सर्वसाधारण समस्यांवर उपदेश अंतर्भूत आहे. तसेच कोर्सची निवड (choice) आणि पुढिल प्रशिक्षण, परिक्षा, नोंदणी आर्थिक आधार, आणि पैसे देणे (Payment) हयांचा अंर्तभाव समुपदेशनामध्ये असू शकतो. इतर शब्दांत सांगावयाचे झाले तर दूरस्थ शिक्षणातील समुपदेशन विद्यार्थी आधार सेवा हया सदराखाली तसेच विस्तृत हे सत्राच्या मध्ये विविध उपक्रमांची व्याप्ती होते.

**समुपदेशन (Counselling)**

विद्यापीठास उपयोगी शैक्षणीक पध्दती विद्यार्थ्यांना (शिकणाऱ्यास) चटकन ग्रहण करण्यामध्ये मदतीसाठी समुपदेशन महत्वाची भूमीका बजावते. निवडक अभ्यास भागावर समुपदेशन विभाग सल्ला देते. ते पुढीलप्रमाणे

१) विविध कोर्समधील अभ्यास

२) व्यावसायिक मार्गदर्शन

३) वैयक्तिक समस्या

विविध माध्यमातून नुकत्याच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन विभाग उद्बोधन (orentation) सेवा पुरविते.

उदाः- रेडिओ व दूरदर्शन वरुन प्रसारण कार्यक्रमामधून व वृत्तपत्रामधून ही सेवा समुपदेशन कार्यान्वीत करते. ही दूरध्वनी व मेल मार्गदर्शन सेवा ( सुपरव्हीजन) देखरेखीसाठी पुरवली जाते.

प्रायोगिक दृष्टया एक व्यक्ती विविध खाजगी शिक्षकांची, विविध विषयांचा तसेच विद्यार्थी सल्लागार/ समुपदेश इ. एकात्मिक भूमिका करतो. खाजगी शिक्षकांच्या जबाबदरीचे मोजमाप करण्यासाठी आपण दूरस्थ विद्यार्थ्यांना मदती साठी विश्वासामध्ये घेणे महत्वाचे आहे. ते म्हणजे “कमी कालावधी मध्ये अभ्यास पूर्ण करावयाचा” हयासाठी खाजगी शिक्षकास सुरवातीच्या अभ्यास कालावधी मध्ये नवीन मार्गांचे आयोजन केले पाहिजे. दूरस्थ खाजगी शिक्षकास प्रयोगिकतेवर व गुणत्मक कार्यावर अधिक जोर (भर) दिला पाहिजे. तसेच विद्यार्थी व खाजगी दूरस्थ शिक्षक हयामध्ये दुमार्गी (Two Way) संप्रेषण आवशक्य आहे.

**समुपदेशनाचे वर्गीकरण (categories of counselling) :**

(शिकणारा) विद्यार्थी व काही प्रकारच्या समुपदेशनाचा शोध घेत असतो. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या ठराविक विशिष्ट (प्रश्नांवर) मुद्यांवर समुपदेशन योग्य प्रतिसाद देते.

आपल्याकडे एकापेक्षा जास्त समुपदेशनाचे प्रकार आहेत. खरोखरच आहेत आपल्याकडे (informing) माहीती (Advising) सल्ला Counselling समुपदेशन (IAC) ही केवळ व्याख्या नाही तर उपक्रमावर आधारित वर्गीकरण आहे. IAC हे इतर दोन वर्गीकरणाशी संबंधित आहे.

(Development) विकास, सुधारणा / Problem Solving समस्या निराकरण / (Academic) शालेय शैक्षणिक/ Non Academic अशालेय ( अशैक्षणिक)

### ७.३.२ सुधारणा किंवा विकासात्मक समुपदेश्रन / समस्या निराकरणे समुपदेशन (Development Counselling & Problem Solving Counselling)

हे विद्यार्थ्यांच्या विकासाशी संबंधित आहे. म्हणून हे पुढील प्रमाणे मुद्दे सुचवितात.









समुपदेशनामध्ये समस्या निराकरणापेक्षा समुपदेशनाचा विकास ( सुधारणा करणे) सोपे आहे. हे नेहमीच तणाव रहीत आहे. विशिष्ट निर्णय घेण्यामध्ये विद्यार्थी घाई (hurry) करीत नाहीत. आणि म्हणून योग्य दिग्दर्शनाचे प्रतिपादन करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ असतो.

समस्या निराकरण समुपदेशन हे नेहमी विद्यार्थ्यांच्या प्रगतीमधील प्रतिबंधासाठी योग्य प्रतीसाद आहे.















**(Academic & Non Academic Counselling) (शालेय ) शैक्षणिक आणि (शाळाबाहय) अशैक्षणिक समुपदेशन :**

जेव्हा संस्थेने गृहीत धरुन समुपदेशन सेवांचे आयोजन केले जाते त्यावेळी हे विशेष मदतनीस ठरते. तसेच वार्षीक आयोजन कोणी करायचे, काय करायचे, केव्हां करायचे हया ठिकाणी वेळेची सेवा मदतीस येते.

**(Academic Counselling) शालेय ( शैक्षणिक ) समुपदेशन :**

सर्व प्रकारे कोर्स व त्यांचे विषयातील विभाग (Topics) उदाः तयारी, विशिष्ट कोर्समधील अभ्यासाचा अवघडपणा (Difficulties) व परीक्षेची तंत्रे शालेय समुपदेशन विशिष्ट संबंधिताकडे आकलनात्मक मुददांकडे लक्ष देते.

**(Non Acedemic Counselling) शाळाबाहय ( अशैक्षणिक) समुपदेशन :**

समुपदेशन इतर सर्व क्षेत्रे व्याप्त करते.

उदा.:

- कोर्सची निवड
- सर्वसाधारण अभ्यासातील अवघडपणा (कठीणपणा)
- परीक्षेची चिंता

शाळाबाहय ( अशैक्षणिक) समुपदेशन हे सर्वसाधारण आणि परीणामकारक मुद्दयांकडे लक्ष देते.

**७.३.३ (Tutoring) खाजगी शिकवणी :**

खाजगी शिक्षक तंज्ञ, अनुभवी, आणि प्रेत्साहन देणारा असावा. तो केवळ उत्तरे देणारा नसावा तर समस्या निराकरण करुन उत्तरे मिळवण्यामध्ये मदत करणारा असावा. त्यांनी जो काही स्वाध्याय केलेला आहे त्या स्वाध्यातील आव्हांने त्यावर प्रकाश टाकत आहे.

- **खाजगी शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या ( असामर्थ्याचे अक्षमता) चे अपंगत्वाचे रोगनिदान अपेक्षीत नाही.** रोगनिदान व्यावसायिक शालेय समुपदेशकाकडून होते. हे खाजगी शिकवणी प्रिकयेच्या बाहेरील आहे.

- **शिकवणीतील पध्दती**

- **प्रशिक्षणाचा शोध घेऊ शकणारा हा परिणामकार खाजगी शिक्षक आहे.** हयामध्ये विषयाचे विवरण तसेच खाजगी शिकवणीच्या पध्दतीचा समावेश आहे.

- **विद्यार्थ्यांना काय अपेक्षित आहे याची स्पष्ट अपेक्षा :** तुमच्या विद्यार्थ्यांना काय अपेक्षित आहे? शिक्षकांना काय अपेक्षीत आहे? विद्यांर्थ्यांच्या जवळच्याना कुटुंब, मित्र, शाळा, विभाग, काय अपेक्षित आहे.

- **आचार – विचारामध्ये नियमामध्ये ( एकवाक्यता) सुसंगती ठेवणे व त्यांचे अनुकरण करणे.** विद्यार्थ्यांसाठी लिहणे, पोस्टाने त्यांना पाठवणे त्यांचा संदर्भ घेणे, आत्यवश्यक नियम परंतु विद्यार्थ्यामध्ये आपसात ऐकमेकास समजेवर आधारित असले पाहिजे. त्यांनी आचार- विचारामध्ये प्रयत्नपूर्वक सुसंगती ठेवली पाहिजे.

- **तुमच्या स्वतःच्या क्षमता व मर्यादा यांची तुम्हास स्पष्ट कल्पना असावयास हवी. -** खाजगी शिक्षक तुम्हास कोणते ज्ञान कोणती कौशल्ये देऊ करतो. खाजगी शिकवणीचे तुम्हास बक्षीसाची संधी आहे विद्यार्थ्यांनी त्याचा पूरेपुर वापर करुन घ्यावा. तुम्ही जे शिकाल त्याचा वापर करा.

**विद्यार्थ्यांना जाणून घ्या किंवा ओळखा -** त्याची / तिची क्षमता कीती आहे. हयाचा शोध घ्या आणि शिक्षणातील आव्हांनाचा शोध घ्या. कोणत्या वातावरणात तो / ती उत्तम अध्ययन करतो? जेमतेम परिस्थिती? (तुमच्यासारखीच किंवा प्रत्येकाची अभ्यास करण्याची पध्दत एक सारखीच असेल असे गृहीत धरु नका.)

**नाते संबंध आणि विश्वास निर्माण करा.**

- **तुमच्या मध्ये व विद्यार्थ्यांमधील फरकासाठी जागृत रहा**.- विद्यार्थ्यांना बदलण्याचा प्रयत्न करु नका. परंतु अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी त्याच्या अध्ययनाच्या पध्दती मध्ये बदल जरुर करा. तुम्ही खूपच अनुभवी आहात. तुमच्यासाठी हे आव्हांन आहे.

- तडजोड करा (adjust)

- स्वीकारा (adopt)

- मार्ग शोधा ( मार्ग शोधा)

**इमानदार मनमोकळे आणि मुक्त व्हा :**

खाजगी शिक्षकास आपण प्रभावित करण्याची गरज नाही ते तुमच्या मदतीसाठीच असतात.

**स्वीकार करण्यास घाबरु नका :**

खाजगी शिक्षक व विद्यार्थ्यामधील सहसंबंध हे बरोबर नाहीत. कदाचीत दुसरे खाजगी शिक्षक अधीक परिणामी असू शकतील. ध्येय हे असले पाहिजे की टीकून राहण्यापेक्षा मदत करणे चांगले आहे.

**विशिष्ट मार्गदर्शन सत्र : (ऊप ऊल्ूदाrग्हु ऐदह )**

खऱ्या समस्येचे उत्तर शोधण्यासाठी उत्तर जवळून ऐका : स्वाध्याय सोडविण्यासाठी / तयार करण्यासाठी पुरेसा वेळ व पुरेसे प्रयत्न केलेले आहेत काय? याची तपासणी करा. (Access the Situation) परिस्थितीचे मूल्यमापन करा.

**वास्तविक उददीष्टांचा विचार करा किंवा करार विकसीत करा. पुढीलप्रमाणे.**

- अध्ययनाच्या निष्पत्तीवर (outcome) वर सहमत व्हा.
- संप्रेषणाची अपेक्षा ( एक / अनेक सत्रे, उपलब्धतता) संप्रेषणाची माध्यमे म्हणजे समोरा – समोर चर्चा, ई -मेल दूरध्वनी इ.)
- समस्या सोडविण्यासाठी प्रश्न विचारण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्युक्त करा. (प्रेरीत करा).
- तुमच्या मध्ये बदल करण्यासाठी तुम्हास काही माहिती नाही असे समजून घाबरु नका.

१) तुम्ही शिक्षकांच्या अंर्तभावा व्यतीरिक्त आणखी जास्त स्त्रोतांचा उपयोग करु शकता.

२) तुम्हीं शिकण्याची समस्या सोडविण्यासाठी, मागील उत्तरे उपयोगात आणण्याची आणि तुम्ही शिकण्याच्या प्रक्रीयेत सहभागी आहे याचे प्रत्यक्षिक देऊ शकता.

**सकारात्मक प्रत्याभरण / अभिप्राय दया. शब्द संग्रह वाढविण्यास प्रोत्साहन द्या.**

- एखाद्या क्षुल्लक गोष्टीच्या कार्यपूर्ती मध्ये सुध्दा यश शोधा आणि तुमच्या प्रयत्नांना बळकटी द्या.
- थोडक्यात सांगा, समीक्षण करा, माहिती मिळवण्यामध्ये समर्थ व्हा, आढावा घ्या.
- कार्यपूर्ती साजरी करा.
- भविष्यातील संदर्भासाठी लीखीत नोंदी करा.

**पाठनिर्देशक व समुपदेशकाची भूमीका :**

के व रॉम्बल १९८१ नी UKOU येथे सांगीतल्या प्रमाणेः-

**अ) लिखित कार्यावर टीपण्णी करणे :**

प्रस्तुत कार्याला श्रेणीबध्द करणे, विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम साहित्य समजण्यासाठी चर्चेद्वारा सहाय्य करणे, समोरा – समोर किंवा अधून मधून दूरध्वनी द्वारे चर्चा आयोजित करणे, स्वतःच्या गटाला व स्वतःस मदत करु इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांना योजना बध्द संयोजन करणे, शिक्षणक्रम साहित्यावर अभिप्राय देणे आणि विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पूर्ण वेळ कर्मचार्यांची नेमणूक करणे.

**ब) पध्दतीमधील प्रश्नांना / शंकांना उत्तरे देणे :**

विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी योजना आखणे, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वतीने वाटाघाटी करणे, त्याला/ अर्जदारास पाहीजे असल्यास सल्ला देणे, नवीन विद्यार्थ्यांना शिक्षण क्रमाशी परिचित करणे, शिक्षणक्रम पंसतीप्रमाणे निवडल्यास सल्ला देणे, व्यवस्थापन विषयक समस्यांना मार्गदर्शन करणे,

उदा.- १) उशीरा दाखल केलेल्या कार्यावर शुल्क आकारणी करणे .

२) विद्यार्थ्यांस अभ्यासाविषयी कौशल्ये विकसीत करण्यास मदत करणे.

अलीकडे पाश्चीमात्य देशामध्ये संगणक सहाय्यित अनुदेशन, पध्दती अवलंबली जात आहे. हया पध्दतीमध्ये विद्यार्थी संगणकपटलावर उत्तरे लिहितात. आणि संगणक त्यावर टिपणी करतो किंवा संगणकवार लिहलेली उत्तरे स्वाध्याय चाचणी परिक्षेवरील टीपण्णी संगणकावर छापून (print) करुन त्याची प्रत विद्यार्थ्यांना पोहचवितात. हयावरून जे काही पुरावे मिळतात त्यावरुन असे लक्षात येते. की पारंपारिक टीपण्णी पेक्षा संगणकाने दिलेल्या टिपण्णी चांगल्या आहेत.

संगणकामुळे शिक्षकांच्या डोक्यावरील बरेचसे ओझे कमी होऊ शकते व त्यामुळे तो दूरस्थ शिक्षण स्वाध्याय साठी वेळ देऊ शकतो. ही प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी फारच उपयोगी आहे.

विद्यार्थ्यांना वैयक्तिक प्रेरीत करण्यासाठी दूरस्थ शैक्षणिक संस्था खाजगी शिकवणीची किंवा विशिष्ट मार्गदर्शनाची व्यवस्था करतात. "शिकवणी (tutorial) वर्ग म्हणजे महाविद्यालयीन शिक्षकाने घेतलेली वैयक्तिक मार्गदर्शन तासीका होय. ही व्याख्या पुढील प्रमाणे स्पष्ट करते.

i. शिक्षका समवेत आदान प्रदान करण्यासाठी दिलेली वेळ.

ii. सुखकर शालेय वातावरण निर्मिती करणे. की ज्या वातावरणामध्ये सर्व प्रकारचे विद्यार्थी स्वतःला सोईस्कररीत्या अभिव्यक्त करु शकतात.

iii. विद्यार्थी व शिक्षक हयामध्ये जवळीक साधावी असे संबंध नर्माण करणे.

वर्गामधील परिस्थितीमध्ये शिक्षक ३० ते १२० विद्यार्थ्यांना शिकवत असतात. तर शिकवणी वर्ग १० / १२ विद्यार्थ्यांना शिकवत असतात. तर शिकवणी वर्ग १० / १२ विद्यार्थ्यांच्या गटा – गटामध्ये होते. वर्गामधील अध्यापन हे शिक्षक केंद्री असते ( हयामध्ये विद्यार्थी काही काळ निष्क्रीय असतात. हे एका दिशेने आणि व्यक्ती निरपेक्ष होते.) शिक्षक विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे जिव्हाळयाचे संबंध निर्माण करु शकत नाहीत.

विशिष्ट मार्गदर्शन वर्गात / शिकवणी वर्गामध्ये अध्ययन व अध्यापन क्रिया ही विद्यार्थी केंद्री असते. (जर शिक्षकाने हेतू परस्पर नियंत्रण केले असेल तर) सर्व दिशेने असते. तसेच ते मित्रत्वाच्या भावनेने होऊ शकते. (हयामध्ये शिक्षक नाहीतर विद्यार्थी सुध्दा एकमेकांजवळ येऊ शकतात.)

जरी शिकवणी अध्यापन वैयक्तिक असले तरी देखील सामान्य वर्गातील व्यक्ती निरपेक्ष अध्यापनामुळे फलीत प्राप्त होते. त्यांची प्रशंसा होते व ते योग्य देखील आहे.

विशिष्ट मार्गदर्शन/ खाजगी शिकवणी ही एक अध्यापन सेवा आहे. ही सेवा विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठीच विद्यापीठाकडून ठेवलेली किंवा आयोजन केलेली असते. शिकवणी वर्गाद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान देण्याचा प्रयत्न करतात. हे ज्ञान विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनामधून स्पष्टपणे समजू शकत नाही. शिकवणी वर्ग विद्यार्थ्यांना त्यांच्या बर्याच समस्या सोडविण्यास मदत करतो. हया वर्गात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याबद्दलच्या समस्या देखील सोडविल्या जातात. शिकवणी वर्ग आठवडयाच्या शेवटी स्थानीक शिक्षण केंद्रात घेतले जातात.

**तुमची प्रगती तपासून पहा :**

१) समुपदेशन म्हणजे काय? व ते व्याख्यान क्रीये पेक्षा कसे वेगळे आहे?

२) विकासात्मक समुपदेशमध्ये व समस्या (निराकरण ) सोडविण्याचे समुपदेशन यामधील मोठा फरक कोणता?

३) एक चांगला शिक्षक (खाजगी) (tutor) एक चांगला शिक्षक (वर्गशिक्षक )नसतो. हया विधानाचे समर्थन करा.

४) विद्यार्थ्यांनी समुपदेशन बंधनकारक आहे का? जर उत्तर होय असेल तर ते का?

## ७.४ अभिप्राय/ प्रत्याभरण यंत्रणा, स्वाध्याय आणि सत्र परीक्षा

अभिप्राय म्हणजे एखादया व्यवस्थेच्या निष्पत्तीच्या (Output) माहीती देण्याची (Input) अशा प्रकारे परत फेड (Return) काही प्रमाणात नियंत्रणात राहील.

प्रत्याभरण/ अभिप्राय हे नकारात्मक असते. जेव्हां (Return) परतफेड सवयींचे नियंत्रण प्रयत्न करते आणि सकारात्मक असते तेव्हा ते एखाद्या गोष्टीला चालना प्रयत्न करते.

१) जेव्हा निर्माण केलेली माहिती ग्रहक देतो आणि प्रेषक ती स्वीकारतो त्यावेळी तो संदेश (Message) असतो. ती ग्रहकाची प्रतिक्रीया असू शकते.

अभिप्राय ही चक्राकार चालणारी संप्रेषणाची प्रक्रीया आहे. ही संदेशास नियंत्रित करते आणि त्याच्यामध्ये बदल घडवून आणते.

२) जेव्हा सकारात्मक अभिप्रयाची यंत्रणा असते तेंव्हा कृतीमुळे प्रतिसाद मिळतो. प्रतीसाद मिळाल्यामुळे क्रीया अधीक गतीमान होते. आणि त्यामुळे अधिक प्रतीसाद प्राप्त होतो. एखादा शिक्षक विद्यार्थ्यांस गृहीत धरुन म्हणजे एखादया विद्यार्थ्यांस हुशार समजून त्याला त्याप्रमाणे तशी वागणूक देतो. तेव्हा तो मुलगा सुध्दा हुशार मुलासारखा वागतो. हे शिक्षकांच्या विश्वासास अधीक बळकटी मिळवून देते. तो विद्यार्थी अधिक हुशार आहे. असा विचार गृहीत धरुन शिक्षक पुढे पुढे जात असतो. शिक्षकास देखील त्याच प्रमाणात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळतो जसे शिक्षक विद्यार्थ्यांना देतात तसेच विद्यार्थी शिक्षकास प्रतीसाद देतात.

साधारणतः सकारात्मक अध्ययन अभिप्राय यंत्रणेमुळे मुलांची प्रचंड प्रमाणात वाढ होते व त्यांच्या मध्ये विकास देखील दिसून येतो. जेव्हा शिक्षक किंवा विद्यार्थी यापेक्षा अधिक काही चांगले करु शकणार नाही किंवा विद्यार्थी दुसर्या वर्गामध्ये जाईल त्यावेळी ही ि्क्रया थांबेल किंवा त्यावर मर्यादा येतील.

सकारात्मक प्रत्याभरण यंत्रणेचे परिणाम सकारात्मक दिसून येतात. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उदाहरणाप्रमाणे परंतु काही वेळा ते नकोसे किंवा नकारात्मक सुध्दा असतात.

नकारात्मक प्रत्याभरण किंवा अभिप्राय यंत्रणा ही स्वयंनिर्मित, स्वयं नियंत्रित, स्वंयअनुभव प्रक्रिया आहे. साधारणतः ही बाहय दबावामुळे होते. ही यंत्रणा आपली मूळची परिस्थिती परत आणण्यासाठी प्रयत्न करते. हया यंत्रणे मुळे आपण आपली मूळची परिस्थिती प्राप्त करु शकतो. आपल्या मूळच्या परिस्थितीस बदलण्यास कारणीभूत असलेल्या परिस्थितीला किंवा परिणामाचा वेग कमी करते.

नकारात्मक विचार किंवा नकारात्मक दृष्टिकोन ही नकारात्मक यंत्रणेची विशेषतः आहे. हा बदलास विरोध करतो. हयाची वैशिष्ट म्हणजे हा नेहमी चांगल्या बदलास / परिणामाय नकारार्थी समजत असतो. अशा प्रकारच्या कार्यात्मक तत्वास “नकारात्मक अभिप्राय यंत्रणा“ असे म्हणतात.

### ७.४.१ दूरस्थ अध्ययनामधील कोर्स ला अभिप्राय पुरविणे : (Providing Feedback in Distance Learner Course)

